रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २९४
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १२ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

उपमुख्यमंत्री फडणवीसांनी केले सभांचे शतक/२
फ्लेमिंगो वाचवण्यासाठी मूक मानवी साखळी/६
रन फॉर वोट मॅरेथॉनद्वारे मतदान जनजागृती/८

## केजरीवालांच्या भविष्यवाणीला अमित शाहांचे प्रत्युत्तर



**हैदराबाद :** भाजपचे सरकार आले तर पुढचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे होणार नसून अमित शाह होणार आहेत. त्यामुळे तुमचे मत अमित शाहांना जाणार आहे, असे विधान नुकतेच तुरूंगातून सुटून बाहेर आलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केले होते. त्यांच्या या दाव्याला केंद्रीय मंत्री अमित शाहांनी उत्तर दिले आहे. हैदराबाद येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना मंत्री शाह यांनी अरविंद केजरीवालांचा दावा फेटाळून लावताना म्हटले की, मी अरविंद केजरीवाल आणि इंडिया आघाडीला सांगतो, पंतप्रधान नरेंद्र मोदी ७५ वर्षांचे होत आहेत याचा आनंद साजरा करण्याची गरज नाही. भाजपच्या संविधानात कुठेही लिहिले नाही की, मोदी पंतप्रधान बनू शकत नाहीत. ते पुन्हा पंतप्रधान होणार आणि आपली टर्म पूर्ण करणार आहेत.

# चौथ्या टप्प्यातील प्रचार थांबला

## १० राज्यांतील ९६ मतदारसंघात उद्या मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्याचा प्रचार शनिवारी (दि.११) संध्याकाळी थांबला. राज्यात चौथ्या टप्प्यात एकूण ११ मतदारसंघात मतदान होईल, तर देशात एकूण १० राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील ९६ मतदारसंघात मतदान प्रक्रिया होणार आहे.

राज्यातील ज्या ११ लोकसभा मतदारसंघात १३ तारखेला मतदान होत आहे त्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, मावळ, अहमदनगर, पुणे, शिरूर, शिर्डी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या मतदारसंघांचा समावेश आहे. प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने उमेदवारांनी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला.

लोकसभेचा महासंग्राम

जालन्यातून केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, दिंडोरीतून भारती पवार, बीडमधून पंकजा मुंडे, शिरूरमधून अमोल कोल्हे आदी नेते चौथ्या टप्प्यात मैदानात आहेत. या सर्वांसाठी त्यांच्या पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी सभा घेतल्या, रॅली काढल्या.

दरम्यान, राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने चौथ्या टप्प्यातील प्रचारावर परिणाम झाला. तरीही राजकीय नेत्यांनी आपल्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भरपावसातही वातावरण तापते ठेवून सांगता सभा गाजल्या. राज्यातील काही जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजरी लावली. त्यामध्ये, पुणे, सातारा, सांगली, बेळगाव, मिरज, बीड, सोलापूर जिल्ह्यात पावसाने हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकटाडही ऐकायला मिळाला. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून विजांच्या ताराही तुटल्या आहेत.



पिंपरी-चिंचवड (पुणे) : मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी भव्य रॅली काढण्यात आली. या वेळी माजी खासदार कृपाल तुमाने, आमदार सुनील बनसोडे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, भाजपचे शंकर जगताप, राष्ट्रवादीचे नाना काटे यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (वृत्त पान २ वर..)

# श्रीरंग बारणेंच्या रूपात हक्काचा खासदार विजयी करा

## आमदार महेश बालदी यांचे उरणकरांना आवाहन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

**उरणकरांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने केले आहे. त्यामुळे केंद्रात पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या रूपाने हक्काचा खासदार विजयी करूया, असे आवाहन उरणचे आमदार महेश बालदी यांनी केले आहे. ते उरणकरांसोबत विकासाचा जनसंवाद या विशेष कार्यक्रमात बोलत होते.**



मावळ लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. या निमित्ताने शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी उरण येथील नगरपालिकेच्या तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी प्राथमिक शाळेच्या मैदानावर आमदार महेश बालदी यांनी उरणकरांसोबत विकासाचा जनसंवाद साधला. ते म्हणाले की, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले, तेव्हापासून मोदी सरकारने व महाराष्ट्र सरकारने विकासाचा धडाका या तालुक्यात लावला. हे मी जबाबदारीने सांगतो की, अख्या महाराष्ट्रात कुठे विकास झाला नाही एवढा विकास या ठिकाणी झाला.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष भोईर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष हनुमंत पिंगळे, मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, भाजपचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष रवि भोईर, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष महेंद्र पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष परिक्षित ठाकूर, मनसेचे तालुकाध्यक्ष सत्यवान भगत, आरपीआयचे तालुकाध्यक्ष संजय गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार महेश बालदी म्हणाले की, आठ वर्षांपूर्वी आपण उरणहून पनवेलला जायचो, तेव्हा जीव मुठीत असायचा हे सर्वांनी अनुभवलंय. रेल्वेचे काम आम्ही हाती घेतले. पाठपुरावा केला. फॉरेस्टची सर्व प्रकरणे सोडवली आणि रेल्वे सुरू केली. मला अभिमान आणि गर्व वाटतो की, साडेबावीस हजार ते पंचवीस हजार प्रवासी आज उरण ते नवी मुंबई असा रेल्वेचा प्रवास करीत आहेत. उरणहून सरळ सीएसएमटीपर्यंत रेल्वे सुरू करायला पाहिजे हेही आपले स्वप्न लवकरच पूर्ण होईल. जात, धर्म, पंथ, भाषा हे कधी बोलतात, जेव्हा त्यांच्याकडची विकासाची हत्यारे संपतात, परंतु आपल्याकडे विकासावर बोलण्यासारखे भरपूर आहे.

उरण नगरपालिकेसाठी १०० कोटी आणले. यांनी दहा कोटी तरी आणायचे होते. यांचे मुख्यमंत्री होते, सत्तेत आमदार होते, पण काही आणायचे नाही आणि काही करायचे नाही, फक्त टीका टोमणे मारायचे हीच यांची नीती व पद्धत राहिली आहे. विरोधक भाषणात विकासाचा एक शब्द बोलत नाहीत. फक्त भाजप कसा वाईट आहे अशा टीका, टोमण्यांनी भाजपवर प्रहार करीत राहतात. आपल्याला एक समृद्ध, संपन्न भारत बनवायचा आहे. आताच चौकला आदिवासी पट्ट्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना ऐकण्यासाठी हजारो लोक उपस्थित होते. एअरपोर्टला मोदीजी आले तेव्हा दीड लाख लोक होते. ही आमची ताकद आहे. जिथे आम्हाला आमची ताकद दाखवायची आहे, तिथे आम्ही दाखवतो.

पंतप्रधान मोदींनी आपल्याला काय दिले आणि त्यांना आपण काय देणार आहोत या अनुषंगाने उरणकरांसाठी हा विकासाचा जनसंवाद आहे. अबकी बार चारसो पार आणि या चारसोमध्ये खासदार श्रीरंग बारणे असायला हवेत. यासाठी खासदार बारणे यांना निवडून देण्याची जबाबदारी आपली आहे, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

उरणमधील रखडलेल्या रेल्वेच्या कामाला गती देण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले. त्याचप्रमाणे मुंबई-उरण अटल सेतू, एसईझेड प्रकल्प, मच्छीमार बंदर, उरणला पाईपव्दारे गॅस पुरवठा, बायपास रस्ता, साडेबारा टक्क्याचा प्रश्न, दासभक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री समर्थ स्मारक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील नामकरण आणि उरणमधील इतर महत्त्वाच्या विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम हे केंद्र व राज्य सरकारने केले आहे. त्यामुळे जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा भाजपचे सरकार केंद्रात येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे, **(पान २ वर..)**

## निवडक

### अपघातामुळे गाडी उलटून आढळली सात कोटींची रोकड

**अमरावती :** लोकसभा निवडणुकीत गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आयोगाकडून प्रयत्न केले जात असताना आंध्र प्रदेशच्या पूर्व गोदावरी जिल्ह्यात एका अपघातामुळे कोट्यवधी रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. नल्लाजारला मंडळातील अनंतपल्ली येथे खासगी वाहन आणि लॉरीची धडक झाली. या धडकेत खासगी वाहन उलटले, ज्यात सात कोटींची रोकड असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी ही रोकड जप्त करून अधिक तपास सुरू केला आहे.

### कुस्तीपटू निशा दहिया पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र

**नवी दिल्ली :** भारतीय महिला कुस्तीपटू निशा दहिया या वर्षी जुलै-ऑगस्टमध्ये होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी कोटा मिळविणारी पाचवी भारतीय महिला कुस्तीपटू ठरली आहे. निशाने ६८ किलो वजनी गटात अंतिम फेरी गाठली असून उपांत्य फेरीत रोमानियाच्या अलेक्झांड्रा उंघेलचा ८-४ असा पराभव केला.

# महाडमध्ये आढळले डेंग्यूचे रुग्ण

## जिल्हा प्रशासनाकडून दखल; अनावश्यक पाणीसाठे नष्ट करण्याच्या सूचना

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरामध्ये काही डेंग्यूचे रुग्ण आढळले असल्याची माहिती समोर आली असून जिल्हा आरोग्य प्रशासनाने याची गंभीर दखल घेत महाड नगर परिषदेसह संभाव्य परिस्थितीचा आढावा घेतला आहे.



महाड शहरातील काही खासगी रुग्णालयात डेंग्यूचे तीन रुग्ण आढळले होते. त्यामुळे त्याची जिल्हा आरोग्य प्रशासनाने त्वरित दखल घेत या रुग्णांच्या परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी रुग्णांच्या घरी जाऊन सुरू असलेल्या उपचाराविषयी माहिती व परिस्थिती जाणून घेतली. रुग्ण आढळल्याने नगर परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांसह डेंग्यूसंदर्भात केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची चाचपणी करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

अनावश्यक पाणीसाठे नष्ट करून अन्य ठिकाणचे पाणीसाठेदेखील नष्ट करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ नये म्हणून नगर परिषदेमार्फत आवश्यक ती औषध फवारणी व धूर मारणे सुरू केले आहे. नागरिकांनीदेखील आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभाग तसेच महाड नगर परिषद प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या वेळी जिल्हा आरोग्य विभाग अलिबागतर्फे अतिरिक्त जिल्हा हिवताप अधिकारी प्रशांत घरत, कीटक समारक, वैभव कदम, वैभव म्हात्रे, ग्रामीण रुग्णालय महाडचे आरोग्य सेवक उमाकांत सोमवंशी यांच्यासह महाड नगर परिषदेचे आरोग्य विभागप्रमुख परेश साळवी, अक्षय साळवी आदी कर्मचारी उपस्थित होते.

# पाकिस्तानने अणुबॉम्ब विकायला काढलाय

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसला टोला

**फुलबनी (ओडिशा) : वृत्तसंस्था**

भारताने पाकिस्तानशी संवाद साधावा आणि आपल्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करू नये; अन्यथा पाकिस्तान भारताविरुद्ध अण्वस्त्रे तैनात करू शकतो, असे विधान काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आज पाकिस्तानची अवस्था अशी आहे की, ते बॉम्ब (अण्वस्त्र) हाताळूही शकत नाहीत. अणुबॉम्ब आता ते विकायला निघाले आहेत, पण लोकांना माहीत आहे ते अणुबॉम्ब चांगल्या दर्जाचे नाहीत, म्हणून ते विकलेही जात नाहीत, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी हल्लाबोल केला. ते ओडिशातील फुलबनी येथे सभेला संबोधित करीत होते.



पोखरण चाचणीच्या वर्धापन दिनानिमित्त बोलताना पंतप्रधान मोदींनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे कौतुक केले. अटलबिहारी वाजपेयी यांनी २६ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी (११ मे) पोखरण येथे अणुचाचणी केली होती. या चाचणीनंतर जगभरातील भारतीयांची मान उंचावली होती, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. तो काळ होता जेव्हा भारताने जगाला आपली ताकद दाखवली होती. दुसरीकडे काँग्रेसची मानसिकता देशाला घाबरवण्याची होती. ते म्हणाले, सावध राहा पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे. हे मरून पडलेले लोक, देशाची मानसिकताही मारण्याचा प्रयत्न करीत आहेत. काँग्रेसची नेहमीच अशी मानसिकता आहे.

आज पाकिस्तानची अवस्था अशी आहे की ते बॉम्ब (अण्वस्त्र) हाताळूही शकत नाहीत. अणूबॉम्ब आता ते विकायला निघाले आहेत, पण लोकांना माहीत आहे ते अणुबॉम्ब चांगल्या दर्जाचे नाहीत, म्हणून ते विकलेही जात नाहीत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. राहुल गांधींचा उल्लेख करीत त्यांनी म्हटले की, राहुल गांधी दररोज वक्तव्ये करीत आहेत. तुम्ही २०१४, २०१९ आणि २०२४च्या निवडणुकीतील त्यांचे भाषण पहा. ते त्याच स्क्रिप्ट वाचतात. विरोधी पक्ष होण्यासाठी काँग्रेसला लोकसभेच्या एकूण जागांपैकी एक दशांश जागा आवश्यक आहेत. देशाने ठरवले आहे की काँग्रेस विरोधी पक्षही राहणार नाही, कारण त्यांची संख्या ५०च्या खाली जाईल. तुम्हाला ते ४ जूनला दिसेल.

दहशतवादाविरोधात कठोर कारवाई करण्याच्या बाबतीत काँग्रेसची मानसिकता कमकुवत असल्याचा आरोप करून मोदी म्हणाले की, दहशतवाद्यांना धडा शिकवण्याऐवजी हे लोक (काँग्रेस) दहशतवादी संघटनांच्या बैठका घेत आहेत. मुंबईच्या २६/११च्या घटनेनंतर दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्याची हिंमत या लोकांमध्ये नव्हती. का? कारण काँग्रेस आणि इंडिया आघाडीने विचार केला की जर ते त्यांच्यावर कठोर कारवाई केली, तर त्यांची व्होट बँक कमी होईल.

# खासदार बारणेंचा आदिवासी वाड्या-वस्त्यांपर्यंत प्रचार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील प्रचार दौऱ्यात मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, आरपीआय, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी अगदी दुर्गम भागातील आदिवासी वाड्या-वस्त्यांपर्यंत मतदारांशी संपर्क साधला. आदिवासी भगिनींनी स्वतःच्या हातांनी बनवलेला रानफुलांचा गुच्छ देत त्यांचे स्वागत केले.



खासदार श्रीरंग बारणे यांनी कर्जत तालुक्यातील पळसदरी, भिसेगाव, चारफाटा, श्रीराम पूल, दहिवली, खांडपे, कोंदिवडे, चोचीवाडी, बीड, मोहिली, धाकटे वेणगाव, जांभिवली, कडाव, कशेळे, पाथरज, खांडस, नांदगाव, बलिवरे, ओलमन, कोळंब, पोशीर, नेरळ, डिकसळ, किरवली आदी गावांचा प्रचार दौरा केला. या प्रचार दौऱ्यात खासदार बारणे यांच्यासमवेत आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शिल्पा देशमुख, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, मनोहर थोरवे, भाजपचे प्रचार प्रमुख किरण ठाकरे, तालुकाध्यक्ष राजेश भगत, सरचिटणीस दीपक बेहरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, कर्जत शहराध्यक्ष भगवान भोईर, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे तालुकाध्यक्ष हिरामण गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते होते.

खासदार बारणे यांनी कर्जत तालुक्यातील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. अत्यंत दुर्गम अशा आदिवासी पाड्यांपर्यंत रस्ते, विकास वीज, पाणी अशा मूलभूत सुविधा पोहचविण्याचे काम केले आहे. त्यामुळे त्यांचे तेवढ्याच प्रेमाने स्वागत होताना पहावयास मिळाले.



### पारंपरिक पद्धतीने स्वागत

*ओलमण गावात माझा भाव आला, असे म्हणत आदिवासी भगिनींनी आपुलकीने आप्पांचे स्वागत केले तसेच स्वतःच्या हातांनी बनवलेला रानफुलांचा गुच्छ देत प्रेमाने ओवाळले. या स्वागताने आप्पा भारावून गेले. मीपण तेवढ्याच हक्कानं मतं मागायला आलो आहे, असे म्हणत आप्पांनी त्यांना मतदानाचे आवाहन केले. एका गावात तर चाहत्यांनी त्यांना हापूस आंब्यांचा हार घातला.*

# आणखी पुढील आठवडाभर अवकाळी

**पुणे : प्रतिनिधी**

राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसाचा जोर पहायला मिळत आहे. एका बाजूला उष्णता आहे, तर दुसऱ्या बाजूला अवकाळी पाऊस पडत आहे. दरम्यान, पुढील आठवडाभर म्हणजे १८ तारखेपर्यंत अवकाळी पाऊस पडणार असल्याचे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी म्हटले आहे.




संपूर्ण मराठवाडा, विदर्भ, खान्देश तसेच नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अशा २९ जिल्ह्यांत पुढील आठवडाभर म्हणजे १८ मेपर्यंत ढगाळ वातावरणासहित तुरळक ठिकाणी भाग बदलत अवकाळी (गडगडाट, विजा, वारा, गारा व धारांसह) पावसाची शक्यता जाणवते.

हवामान तज्ज्ञ खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार ११ ते १४ मे असे चार दिवस संपूर्ण विदर्भ मराठवाडा, खान्देश तसेच नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अशा २९ जिल्ह्यांत मध्यम अवकाळी पावसाची शक्यता अधिक जाणवत आहे. १२ ते १४ मेपर्यंतच्या तीन दिवसांत कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, यवतमाळ गडचिरोली या आठ जिल्ह्यात मध्यम अवकाळी पाऊस व गारपीटीच्या शक्यतेची तीव्रता अधिकच जाणवू शकते.

११ ते १६ मेपर्यंतच्या सहा दिवसांत मुंबई, उपनगरसह संपूर्ण कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी सिंधुदुर्ग अशा सात जिल्ह्यातही आता ढगाळ वातावरण राहून अगदीच तुरळक ठिकाणीच किरकोळ पावसाची शक्यता जाणवत आहे.

दरम्यान, १८ मेपर्यंतच्या आठवड्यात मुंबईसह कोकणातील कमाल व किमान तापमान सरासरी इतके म्हणजे ३३ व २५ अंश सेल्सिअस, तर उर्वरित महाराष्ट्रात ४० व २६ अंश सेल्सिअसदरम्यान असणार आहे. उष्णतेची लाट, दमटयुक्त उष्णता किंवा रात्रीच्या उकाड्याची शक्यता सध्या महाराष्ट्रात जाणवणार नाही, असे हवामान तज्ज्ञ खुळे यांनी म्हटले आहे.

# विरोधकांचे बारा वाजणार -मुख्यमंत्री

## पिंपरीमध्ये खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ रोड शो




**पिंपरी : प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत. त्याचबरोबर मावळमधूनही श्रीरंग बारणे तिसऱ्यांदा खासदार होणार आहेत. त्यामुळे तेरा तारखेला विरोधकांचे बारा वाजणार आहेत, असा इशाराच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.११) रोड-शो करत प्रचार केला. शहरातील चाफेकर चौकातून या रॅलीची सुरुवात झाली. साडेतीन ते चार तास ही रॅली चालली. सकाळी नऊ वाजता सुरू होणारी रॅली दुपारी बारा वाजता सुरू झाली. यावेळी आमदार अश्विनी जगताप, उमा खापरे, आण्णा बनसोडे आदी उपस्थित होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात तिन्ही टप्प्यामध्ये महायुती सर्वांत पुढे असून ४५ पार जागांवर जिंकणार आहेत. महिलांनी १३ तारखेला मतदानामध्ये सहभागी व्हावे, त्याचबरोबर कुटुंबातील व्यक्तींना मतदानासाठी पाठवावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत आणि विधान सभेत महिलांना आरक्षण दिले आहे. आगामी निवडणुकांमध्ये संसदेत आणि विधानसभेत महिला दिसतील, असंही शिंदे म्हणाले.

शिंदे म्हणाले, महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे हॅट्रिक नक्की करतील. बारणे यांना मोठा प्रतिसाद असल्याचे पाहायला मिळते. अबकी बार आप्पा तिसरी बार खासदार अशी घोषणा देत मावळमध्ये ७५ ते ८० टक्के मतदान झाल्यास तुम्हाला मंत्रिपद देऊ, असे या वेळी शिंदे म्हणाले.

## सांगलीमध्ये वादळी पाऊस



**सांगली : प्रतिनिधी**

अचानक आलेल्या वादळी वारे आणि गारपीट पावसामुळे सांगलीच्या ऐतवडे खुर्दमध्ये दोन घरावर झाड पडून नुकसान झाले. शुक्रवारी सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने पश्चिम भागात हजेरी लावली असली तरी पूर्व भाग पावसाच्या प्रतिक्षेत आहे.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ऐतवडे खुर्द येथील वैभव बाळासो दाइंगडे व दत्तात्रय शहाजी पाटील यांच्या वारणा शिक्षण संस्थेच्या शेजारी असणाऱ्या घरावर शनिवारी झालेल्या व अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारपीट पावसामुळे झाडे पडून मोठे नुकसान झाले आहे. शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

शुक्रवारी दिवसभर उन्हाने लाहीलाही होत असताना सायंकाळी विजेच्या गडगडाटासह ऐतवडे खुर्दसह कुंडलवाडी चिकुर्डे देवर्डे आदी परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झोडपून काढले. यामध्ये ऐतवडे खुर्दमधील दोन घरांवर झाडे पडल्याने भिंत पडून मोठे नुकसान झाले तर वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी झाडे रस्त्यावर पडली. ऐतवडे खुर्द येथील रस्त्यालगत असणारे अनेक शेत वस्तीवरील पत्र्याचे छप्पर उडून गेले. शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या पावसाने सर्वत्र गारवा निर्माण झाला असून हा पाऊस ऊस पिकाला वरदायी ठरणारा असल्याचे शेतकऱ्यांतून बोलले जात आहे.

## सर्वाधिक सभा घेऊन पंतप्रधान मोदींचा रेकॉर्ड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात चौथ्या टप्प्यात ११ मतदारसंघात मतदान होत असून देशभरातील विविध राज्यात चौथ्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. त्यामुळे, देशपातळीवरील नेतेही प्रचारसभांचे दौरे कर आहेत. पहिल्या तीन टप्प्यातील प्रचारसभांची आकडेवारी पाहिल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्वाधिक सभा घेऊन रेकॉर्ड केला आहे. पहिल्या तीन टप्प्यात मोदींनी तब्बल ८३ सभा घेतल्या आहेत. त्यामुळे, प्रचारसभांच्या रणधुमाळीत मोदींचा पहिला नंबर लागतो.

प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी ३१ मार्च ते ५ मे या पहिल्या तीन टप्प्यांत ८३ प्रचारसभा घेऊन पहिल्या क्रमांकावर आहेत. तर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. अमित शाह यांनी ६६ सभा आणि रोड शो केले आहेत. या काळात पंतप्रधान मोदींनी १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ८३ निवडणूक सभा आणि 'रोड शो'मध्ये भाग घेतला आहे, याबाबत भाजपच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही आकडेवारी समोर आली आहे. दरम्यान, मोदींच्या तुलनेत काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी ४० निवडणूक प्रचारसभांना संबोधित केले, तर प्रियांका गांधी यांनी २९ प्रचार सभांमधून जनतेला संबोधित केले आहे.

३१ मार्च ते ५ मे या तीन टप्प्यांतील निवडणूक प्रचारात सर्वाधिक निवडणूक प्रचारसभा घेण्याचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर झाला आहे. दरम्यान, १४ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीमध्ये उमेदवारी दाखल करणार आहेत. तत्पूर्वी १३ मे रोजी त्यांच्या विशाल 'रोड शो'चे आयोजन करण्यात आले आहे.

## वाढत्या उकाड्याने रोहेकर हैराण

**रोहा : रामप्रहर वृत्त**

रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे शरीराचा दाह कमी करण्यासाठी शीतपेय, ज्यूस, ताक, लस्सी याकडे नागरिकांचा कल वाढताना दिसून येत आहे.

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याने रोहेकर हैराण झाले आहेत. तापमानाचा पारा ४० अंशापेक्षा जास्त गेला असल्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांना मागणी वाढली आहे. सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके बसू लागले आहेत. भरमसाठ वृक्षतोड व दिवसेंदिवस लावले जाणारे वणवे यामुळे वनसंपदा नष्ट होत असल्यामुळे परिसर व रस्ते आग ओकत आहेत. वाढते प्रदूषण व सतत होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाने जंगले ओस पडू लागली आहेत. त्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. शहरात कुलर खरेदीच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच रसाळ फळांना मागणी वाढली आहे. उष्ण्यापासून बचाव होण्यासाठी अनेकजण सकाळी अकराच्या आतमध्ये आपापली कामे आटोपून घेत आहेत. दुपारी मार्केट परिसर ओस पडू लागले आहेत. संध्याकाळी नागरिक घराबाहेर पडू लागले आहेत. येथील विहिरीमध्ये दुपारी उष्म्यापासून बचावासाठी अनेकजण पोहण्याचा आनंद घेताना दिसून येत आहेत.

## दिघोडे-दास्तान फाटा उड्डाणपुलावर आज, उद्या अवजड वाहनांना बंदी



**उरण : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघ अंतर्गत १९०-विधासभा मतदार संघासाठी उरण, पनवेल व खालापूर तालुक्यातील एकूण ३४४ मतदान केंद्रावर १३ मे २०२४ रोजी मतदान होणार असल्याने रविवारी (दि. १२) मतदान अधिकारी व कर्मचारी यांना जासई येथील १९० विधानसभा निवडणूक कार्यालयातून निवडणूक साहित्य वितरण करण्यात येणार आहे.

यामुळे १२ मे रोजी सकाळी ६ ते दुपारी २ आणि १३ मे रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत उरण तालुक्यातील दिघोडे ते दास्तानफाटा उड्डाणपुलावरून जाण्यासाठी अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. यामध्ये वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही इतर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने तसेच पोलीस वाहने, फायर ब्रिगेट, रुग्णवाहिका, निवडणुकीची वाहने व इतर अत्या आवश्यक वाहनांना लागू होणार नाही.

दिघोडे येथून दास्तान मार्गाकडे जाणारी अवजड वाहने पर्यायी जांभूळपाडा, वागधोंडी, गव्हाणफाटा जंगलकट मार्गे इच्छित स्थळी जाण्यासाठी ठेवण्यात आल्याचे आदेश नवी मुंबई वाहतूक पोलीस विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिले असून, तशा प्रकारे अवजड वाहनचालकांनी या आदेशाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलंडे यांनी केले आहे.

## दुरुस्ती कामानंतर पाणीगळती थांबली

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रसायनीतील वासांबे (मोहोपाडा) येथे एमआयडीसीच्या जलशुद्धीकरण केंद्राला अशुद्ध पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी एचओसी कॉलनीत फुटली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होऊन वाया जात असल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत होते.

एमआयडीसीच्या पाताळगंगा नदीवरील उदंचन केंद्रातून अशुद्ध पाणी उचलून या मोठ्या जलवाहिनीतून वासांबे (मोहोपाडा) येथील जलशुद्धीकरण केंद्रात सोडण्यात येत आहे. या ठिकाणी पाणी शुद्ध करून गाव आणि कारखान्यांना पुरवठा करण्यात येत आहे. दरम्यान, जलवाहिनी फुटली असल्याची बाब जागृत नागरिकांनी एमआयडीसीच्या निदर्शनास आणून दुरुस्तीची मागणी केली होती. त्यानंतर एमआयडीसीने नुकतेच दुरुस्तीचे काम करून पाणी गळती थांबवली असल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहे.

वासांबे (मोहोपाडा) येथील जलशुद्धीकरण केंद्रातून रसायनीतील तसेच पनवेल तालुक्यातील इतर ग्रामपंचायत आणि रसायनीतील कारखान्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.



**उरण : आमदार महेश बालदी यांच्या सौभाग्यवती नीता बालदी यांनी पिरकोन गावात भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना जास्तीत जास्त मतदान करून भरघोस मतांनी निवडून आणा, असे आवाहन केले. या वेळी ओबीसी सेल जिल्हा सचिव प्रा. प्रमोद म्हात्रे, पिरकोनचे माजी सरपंच के.वाय. गावंड, गाव उपाध्यक्ष बाळकृष्ण पाटील, ज्येष्ठ नेते अनंत गावंड, श्री गणेश महिला मंडळाच्या सचिव बिंदू गावंड, पाले गावातील सामाजिक कार्यकर्त्या वच्छा म्हात्रे, पिरकोन भाजप बूथ अध्यक्ष कमलाकर गावंड आदी उपस्थित होते.**



**उरण : भाजप महिला मोर्चा तालुका सरचिटणीस निर्मला प्रभाकर घरत यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत सावरखार येथे भाजप कार्यकर्त्यांनी महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी पत्रकांचे वाटप केले. या वेळी अनिता तांडेल, तेजश्री कडू, मेघा ठाकूर, शेवानंद तांडेल आदी उपस्थित होत्या.**

## शितल भटनागर बनली मिसेस यूएई इंटरनॅशनल

**पनवेल : वार्ताहर**

दुबईत बिइंग मुस्कान इव्हेंट्सने आयोजित मिसेस यूएई इंटरनॅशनल २०२४ स्पर्धेत नवी मुंबईच्या व्यावसायिका शितल भटनागर यांनी अव्वल स्थान मिळवत नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. दुबईतील प्रतिष्ठित अशा रामी ड्रीम हॉटेलमध्ये हा सोहळा झाला. भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शितल भटनागरच्या यांचे कौतुक होत आहे.



नवी मुंबईतील शितल भटनागर या दागिन्यांचा व्यवसाय करत असून आपल्या कामाबरोबरच त्या शारीरीक तसेच मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठीदेखील तितक्याच प्रयत्नशील असतात. भरतनाट्यमपासून ते साल्सा डान्सपर्यंय असे विविध नृत्यप्रकार त्यांना अवगत आहेत. त्याचबरोबर शारीरीक बळकटीसाठी आणि स्वसंरक्षणासाठी त्यांनी तायक्कांदोचेदेखील प्रशिक्षण घेतले आहे.

पान १ वरून

## श्रीरंग बारणेंच्या रूपात हक्काचा खासदार विजयी करा

असा विश्वास व्यक्त करून मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयी रथात स्वार होण्यासाठी आपण सज्ज होऊया, अशी हाक आमदार महेश बालदी यांनी उपस्थितांना दिली.

दरम्यान, लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ, उरणकरांच्या स्वप्नातील रुग्णालय, उरण बायपास रस्ता, पीरवाडी समुद्र किनाऱ्याचे सुशोभीकरण, चारफाटा येथील मच्छी मार्केटची उभारणी, केगाव-दांडा रस्ता त्याचबरोबर उरण नगर परिषदेमार्फत सुरू असलेल्या विकासकामांमध्ये पालिकेची नवीन शासकीय इमारत, शहरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण, फुल मार्केट, समाजमंदिर, नाट्यगृह, मल्टिप्लेक्स थेटर आदी विकासकामे सुरू असल्याचा उल्लेख आपल्या भाषणातून केला. या वेळी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनीही विचार मांडून खासदार श्रीरंग बारणे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, शहर अध्यक्ष कौशिक शाह, कामगार नेते सुधीर घरत, कामगार नेते सुरेश पाटील, शिवसेनेचे उपजिल्हाध्यक्ष अतुल भगत, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, सरचिटणीस निर्मला घरत, जिल्हा उपाध्यक्ष संगीता पाटील, भाजप उरण पूर्व अध्यक्ष शशी पाटील, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, पंडित घरत, सुनील पाटील, दिनेश तांडेल, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, हितेश शाह, अजित भिंडे, मनन पटेल, मकरंद पोतदार, निलेश कदम, चंद्रकांत ठक्कर, योगेश पाटील, जसीम गॅस, प्रमोद म्हात्रे, करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, मनोहर सहतीया, पुरषोत्तम सेवक, हस्तीमल मेहता, माजी नगरसेवक-नगरसेविका, आजी माजी सरपंच, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले सभांचे शतक

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकातील चौथ्या टप्प्याचे मतदान १३ मे रोजी पार पडेल. शनिवारी प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीने सभांचा धडाका लावला होता. यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आघाडीवर होते. त्यांच्या सभेला मोठी मागणी होती. पहिल्या टप्प्याची घोषणा होताच फडणवीसांनी दौरा घोषित केला. यात फडणवीस १२५ हून अधिक सभा राज्यात घेणार असल्याचे बोलले गेले. आता चौथा टप्पा पार पडत असताना फडणवीसांनी सभांचे शतक झळकवले आहे. पाचवा टप्पा अजून बाकी आहे. फडणवीसांच्या रेकॉर्ड ब्रेक सभा भाजपसाठी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीसांची राजकीय ताकद वाढल्याचं यातून दिसून येते, असे भाजप समर्थक व्यक्त करतायेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी १०० सभांचा आकडा पुर्ण केला आहे. असे करणारे ते राज्यातील पहिल्या फळीतील नेत्यांपैकी एकमेव नेते आहेत. फडणवीसांनी महाराष्ट्रातच नव्हे तर केरळमध्ये ही एक सभा घेतलीये. राज्यात ९९ आणि केरळात एक अशा १०० सभा त्यांनी घेतल्यात. भाजपने ४०० पार जाण्याचा नारा दिला आहे. हे करताना घटक पक्षांच्या उमदेवारांची विजय निश्चिती महत्त्वाची आहे. यासाठी मोदी, शहांप्रमाणे फडणवीसांच्या सभेची ही मागणी वाढली होती. राज्यात लोकसभेचे ४८ मतदारसंघ आहेत. फडणवीसांनी १३० हून अधिक सभा घेण्याचं नियोजन आखले आहे. प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील तालुक्याच्या ठिकाणी ही या सभा होणारेत. आकडेवारी पाहिली तर प्रत्येक लोकसभा मतदारसंघात सरासरी तीन सभा फडणवीस घेत आहेत. सभांचा हा वाढता आकडा फडणवीस म्हणजेच विजय निश्चिती असे समीकरण प्रस्थापित करत असल्याचे बोलले जाते.

देवेंद्र फडणवीसांनी आपली १०० वी सभा पुण्यात घेतली. पुणे लोकसभा मतदारसंघात मुरलीधर मोहोळ हे भाजपचे उमेदवार आहेत. दुसरीकडे काँग्रेसने ही जागा महाविकास आघाडीतून मिळवली. कसब्याचे आमदार रवींद्र धनगेकर खासदारकीची निवडणूक लढत आहेत. भाजपसाठी ही निवडणूक अडचणीची करण्यासाठी पवार आणि ठाकरे तयारीत आहेत. अशात देवेंद्र फडणवीसांची सभा इथे गेमचेंजर असल्याचे सांगण्यात येतेय. पुण्याची जागा देवेंद्र फडणवीसांनी गांभीर्याने घेतल्याचे बोलले जातेय. आज पुण्यात फडणवीसांनी प्रचाराची सांगता केली. शिवाय आज पुण्यातच फडणवीसांचा मुक्काम असणार आहे. १३ मेला राज्यातील नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे.

फडणवीसांनी १०० सभा घेतल्या आहेत. भाजपसह महायुतीतील शिंदे गट आणि पवार गटासाठीही फडणवीसांनी सभा घेतल्या. फडणवीसांच्या सोशल इंजिनिअरिंगमुळे हा आकडा वाढल्याचे बोलले जातेय. मराठा आरक्षणाचा मुद्दा असो की ओबीसी आरक्षणाचा, फडणवीसांनी यातून मध्यमार्ग काढला. दोन्ही समाजाचा असंतोष सामंज्यस्यात बदलला. पुढे मायक्रो ओबीसी समाजांना महामंडळे दिली. प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील सर्वच वर्गांमध्ये फडणवीसांबद्दलची सरकारात्मक भावना तयार झालीये, असे मत भाजप कार्यकर्ते व्यक्त करतायेत.

## निवडक

### इमारतीवरून पडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** इमारतीवरून खाली पडून एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. करंजाडे सेक्टर एक येथील प्लॉट नंबर ३२१, निर्माणधीन ईमारतीच्या समोर मोकळ्या जागेत वरचे ओवळे, पुष्पक नोड, सेक्टर १ पनवेल येथे अंदाजे ३० ते ३५ वर्षीय व्यक्ती निर्माणधीन इमारतीवरून खाली पडून जखमी बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### साई गावातून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील साई गाव येथून एक विवाहिता बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका



पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अंजली म्हात्रे (वय ४३) असे या महिलेचे नाव असून उंची पाच फुट, रंग गोरा, केस लांब व काळे, डोळे काळे, बांधा मध्यम असून अंगात हिरवी साडी व पायात पैंजण घातलेले आहे. तसेच तिला मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा पोलीस नाईक संजय पोळकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शीतपेयांना मागणी वाढली

**पनवेल :** दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याने पनवेलकर हैराण झाले आहेत. तापमानाचा पारा ४० अंशापेक्षा जास्त गेला असल्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांना मागणी वाढली आहे. यामुळे वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे शरीराचा दाह कमी करण्यासाठी शीतपेय, ज्यूस, ताक, लस्सी याकडे नागरिकांचा कल वाढताना दिसून येत आहे.

# निवडणूक काळात कोट्यवधींची रोकड जप्त

## नवी मुंबई पोलिसांकडून बेकायदेशीर कृत्यांवर कारवाया

**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नियुक्त करण्यात आलेल्या फिरते निगराणी पथक व स्थिर देखरेख पथकाने गत दिड महिन्यामध्ये बेकायदेशीररीत्या वाहनातून नेली जाणारी तब्बल दोन कोटी नऊ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. त्याशिवाय नवी मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थाची तस्करी करणारे, बेकायदा मद्य बाळगणारे व विकणारे, तसेच बेकायदा शस्त्र बाळगणारे व विक्री करणाऱ्यांवरही धडक कारवाई केली आहे.



मुंबई, ठाण्यात पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या कालावधीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडुन प्रयत्न करण्यात येत आहेत. निवडणुक आयोगाकडुन लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये तसेच आचारसंहीतेचे काटेकोर पालन व्हावे यासाठी नवी मुंबई पोलिसांकडुन विशेष खबरदारी घेतली जात आहे. त्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १२ फिरते निगराणी पथक (एफएसटी) तसेच १४ स्थिर देखरेख पथक (एसएसटी) नियुक्त करण्यात आले आहेत.



या पथकाच्या माध्यमातुन बेकायदा नेली जाणारी मोठी रोकड, अंमली पदार्थ, अवैध मद्यसाठा आणि मद्याची वाहतूक करणार्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. या पथकाने गत १६ मार्च ते ७ मे या कालावधीत स्थिर देखरेख पथकाने सहा कारवायांमध्ये तब्बल दोन कोटी नऊ लाख १० हजारांची रक्कम पकडली आहे. यात नुकतीच ऐरोली येथे रिक्षातून नेली जाणारी तब्बल एक कोटी ६० लाखांची रोकड पकडलेल्या रक्कमेचादेखील समावेश आहे. अमली पदार्थ विरोधी कारवाई नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथक व पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाची तस्करी व सेवन करणाऱ्यांविरोधातदेखील मोठी कारवाई केली असून आचारसंहीता लागू झाल्यापासून पोलिसांनी आतापर्यंत अमली पदार्थ तस्करीच्या २८ कारवाया केल्या आहेत. यात एक कोटी ८८ लाख ७० हजार रुपये किमतीचे २०७६ ग्रॅम वजनाचे कोकेन, ६१ लाख ६३ हजार ७८० रुपये किंमतीचे ५९८.४५ ग्रॅम एमडी तसेच ५५ लाख ६८ हजार रुपये किमतीचे १८५६ ग्रॅम वजनाचे चरस, नऊ लाख ५० हजार ७५५ रुपये किंमतीचा ५६ किलो १८७ ग्रॅम वजनाचा गांजा, तर नऊ लाख ८० हजार रुपये किंमतीचे १.२४ ग्रॅम एलएसडी हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. बेकायदा शस्त्र जप्तीची कारवाई नवी मुंबई पोलिसांनी निवडणुक आचारसंहितेच्या काळात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचीदेखील पोलिसांनी धरपकड केली असून अतापर्यंत पोलिसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्याविरोधात ३६ गुन्हे दाखल करुन वेगवेगळ्या प्रकारचे ३७ शस्त्र जप्त केले आहेत. यात पिस्टल, गावठी कट्टा व रिव्हॉल्वर नऊ तसेच २५ जिवंत काडतुस जप्त केले आहेत.

याचप्रमाणे तलवार, चॉपर, सुरा, चाकू या सारखी २८ हत्यारे जप्त केली आहेत. बेकायदा मद्यविक्रेत्यांवर कारवाई निवडणुकीच्या काळात दारूची मोठ्या प्रमाणात अवैध विक्री केली जाते. दारुच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरू आहेत. आतापर्यंत नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारून दारू विक्रेत्यांवर तसेच गावठी हातभट्टीची दारू गाळणाऱ्यांवर १९३ कारवाया केल्या आहेत.

या कारवाईत पोलिसांनी छापेमारी करून चार लाख ८७ हजार ४६८ रुपये किमतीची ४२२०.३८ लिटर दारू जप्त केली आहे. त्याचप्रमाणे गुटखा व पानमसाला विक्री व वाहतूक करणाऱ्याविरोधात नऊ कारवाया करून ३२ लाख २६ हजार ५९६ रुपये किमतीचे १०,६०५ गुटख्याचे पाऊच जप्त केले आहेत.

## जेएनपीए बंदरात चीनमधून आलेले १२२ संशयास्पद कंटेनर जप्त

**सीमा शुल्क विभागाची कारवाई**

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनसीएच्या कस्टम सेंट्रल इंटेलिजेंस युनिटने बंदी घातलेले चिनी फटाके, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मायक्रोचिप आणि इतर प्रतिबंधित संशयित पदार्थ असल्याच्या संशयावरून १२२ कंटेनर रोखून ठेवले आहेत. हे संशयित कंटेनर बनावट मालाच्या नावाने जेएनपीए बंदरात आणण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे.



उरण परिसरातील पंजाब कॉनवेअर गोदामात आलेल्या अनेक कंटेनरची तपासणी केली असता कस्टमला या कंटेनरची विशिष्ट माहिती मिळाली होती. कर चुकवून बनावट मालाच्या नावाने व तस्करीच्या मार्गाने बंदी घातलेले चिनी फटाके, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मायक्रोचिप आणि इतर प्रतिबंधित पदार्थ भरलेले हे सर्व संशयित १२२ कंटेनर एकाच जहाजातून जेएनपीए बंदरात आणण्यात आले आहेत. याआधीही त्याच एका चिनी पुरवठादाराच्या संबंधातुन प्रतिबंधित माल तस्करीच्या मार्गाने आयात करण्यात आला होता. त्यामुळे पुन्हा त्याच पुरवठादाराशी संबंधित असलेले सर्व संशयित कंटेनर होल्डवर ठेवून कसुन तपासणीसाठी सीमा शुल्क विभागाच्या सीआययु अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले आहेत.

तपासणीत काही कंटेनर साफ केले गेले असल्याचे आढळून आले आहेत. त्यामुळे सीआययुने परिसरातील कंटेनर फ्रेट स्टेशन्स आणि कंटेनर टर्मिनल्सच्या सर्व व्यवस्थापकांना 'ईमेलद्वारे नोंदींची बिले, मूल्यांकन आणि कंटेनरची स्थिती यासह कंटेनरचे तपशील सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. रेड–लीड आणि लिथियम सारखी विषारी रसायने असलेल्या खराब–गुणवत्तेच्या विदेशी फटाक्यांचा ओघ रोखण्यासाठी सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अनेक उपाययोजना केल्या जात आहेत, मात्र त्यानंतरही चीनमधुन भारतात प्रतिबंधित फटाक्यांच्या निषिद्ध मालाची तस्करी होत असल्याचा संशय आहे.

सीआययूला मिळालेली विशिष्ट माहिती आणि त्यांच्या शोधाचा हेतू तपासात सहभागी असलेल्या काही अधिकाऱ्यांनाच माहिती आहे. त्यामुळे सीमाशुल्क विभागाने या कारवाईबाबत अद्यापही अधिकृतपणे कोणतीही माहिती जाहीर केलेली नाही. अधिकाऱ्यांना या कंटेनरशी संबंधित गोपनीय माहिती मिळाली आहे. ज्याचा खुलासा करता येणार नाही. पुढील सूचना मिळेपर्यंत १२२ संशयित कंटेनर सीसीटीव्ही व अधिकाऱ्यांच्या निगराणीत ठेवण्यात आले असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

## तळोजा परिसरातील नागरिक प्रदूषणाने बेजार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा परिसरातील नागरिकांना त्रासदायक ठरणारा प्रश्न अद्याप सुटू शकलेला नाही. चार दिवसांपूर्वी पहाटे रसायनांच्या उग्र दर्पाने तळोजातील रहिवाशांना असह्य त्रास झाला. अखेर नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित यंत्रणांकडून खुलासा मागितला आहे.



पनवेलमधील तळोजा फेज २ परिसरात पहाटेच्या वेळी रसायनांचा उग्र दर्प येण्याचे प्रकार वारंवार घडत असतात. शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास रसायनांसारखा दर्प येऊ लागल्यामुळे गाढ झोपेत असलेल्या नागरिकांची झोपमोड झाली. ही दुर्गंधी इतकी असह्य होती की, उकाड्यामुळे उघडलेल्या खिडक्या बंद करण्याची वेळ नागरिकांवर आली. तळोजा फेज २ परिसरात नव्या लोकवस्ती वाढत आहेत.

या रहिवाशांना प्रदूषणाचा त्रास होण्याची ही पहिली वेळ नाही. शेजारी असलेल्या तळोजा एमआयडीसीतील रासायनिक कारखान्यांमधून येणाऱ्या दर्पाचा येथील रहिवाशांना नेहमीच त्रास होत असतो. तळोजातील रहिवासी राजीव सिन्हा यांनी तातडीने संबंधित यंत्रणांना ईमेल करून या प्रकाराची तक्रार केली. शनिवारी पहाटे पुन्हा काही प्रमाणात दुर्गंधी आल्याचे सिन्हा यांचे म्हणणे आहे. सिन्हा यांनी केलेल्या तक्रारीनंतर सीईटीपीतील पाण्याचे नमुने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चाचणीसाठी घेतल्याचे सांगण्यात आले.

## पनवेल ग्रामीण भागात पोलिसांचा रूटमार्च



**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा २०२४ निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलिसांनी ग्रामीण भागात रूटमार्च काढून निवडणूक शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षे अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे येथी एक आरपीएफ जवानांची कंपनी प्राप्त झाली होती.

कंपनीचे दोन अधिकारी, २२ अंमलदार, झोन दोन स्ट्रायकिंग वरील एक अधिकारी ११ अंमलदार यांचा समावेश होता. त्यांच्यासह पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांच्यासह दोन सहाय्यक निरीक्षक पोउनिरी व १७ पोलीस अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील रिटघर, दूंदरे, नेरे या गावामधील मतदान केंद्रे व बूथ तसेच गर्दीच्या ठिकाण येथे भेट देऊन निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून गावामध्ये पायी रूटमार्च करण्यात आला व निवडणुकीत शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

## गांजा विक्री करणाऱ्यास अटक

**पनवेल :** उरण फाटा येथे गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला सीबीडी पोलिसांनी अटक केली आहे. राजु बाबु धोत्रे (वय ४६) असे या व्यक्तिचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळ असलेला १२०० ग्रॅम वजनाचा १८ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे.

सायन पनवेल मार्गालगत उरण फाटा येथे एक व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती सीबीडी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे व त्यांच्या पथकाने गेल्या सोमवारी रात्री उरण फाटा येथील टी–पॉंईटजवळ सापळा लावला होता. या ठिकाणी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास राजु बाबु धोत्रे हा सॅक बॅग घेऊन संशयास्पदरित्या आला असता, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या जवळ असलेल्या सॅक बॅगची झडती घेतली असता, त्यात १८ हजार रुपये किमतीचा १२०० ग्रॅम वजनाचा पाने, फुले, काड्या, बिया असलेला उग्र वासाचा गांजा आढळुन आला. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे गांजाबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने हा गांजा विक्री करण्यासाठी आणल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याविरोधात एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. तसेच त्याच्याजवळ असलेला गांजा जप्त केला.




**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी भाजपचे मावळ लोकसभा निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच सुपरवॉरिअर्स किरण माळी यांनी कराडे खुर्द ग्रामपंचायत हद्दीत प्रचार केला. या वेळी माजी सरपंच विजय मुरकूटे, रवींद्र चितळे, बूथ अध्यक्ष विनायक महाडिक, उपसरपंच मिनल ठोंबरे, माजी उपसरपंच भानूदास माळी, ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील, मुकेश पाटील, युवा नेते विजय मुरकुटे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये आरोग्य शिबिर ; विविध तपासण्या होणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ए बी एन टेक्नॉलॉजी, महामना मालवीय मिशन मुंबई आणि इंटरनॅशनल वैश्य फेडरेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन शनिवार २५ मे रोजी व्ही के हायस्कूल, पनवेल येथे सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या वेळी मोफत कर्करोग चिकित्सा व उपचार, मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रिया मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार आदी मोफत केले जाणार आहेत.

मोफत कॅन्सर स्क्रीनिंग आणि मल्टी स्पेशालिटी आरोग्य शिबीर आणि बहु–विशेष वैद्यकीय शिबीर आयोजित केले आहे. शिबीरासाठी डॉ. अजय नकाशे, अध्यक्ष ट्रिनिटी एड्स फाऊंडेशन, आणि विश्वस्त वैश्यसभा, कमिशनरेट ऑफ हेल्थ सर्विसेस, महाराष्ट्र टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. या शिबीराची मुख्य वैशिष्ट्ये सर्व महिलांसाठी मोफत झ–झ ङ्चए–ठ चाचणी, या शिबीरात नोंदणी केल्यास महाराष्ट्रात कुठेही मोफत उपचार, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, १८ गावांतील सर्व ग्रामस्थांना मोफत त्यांच्या गावातून आणण्यासाठी आणि सोडण्यासाठी गाडीची व्यवस्था केली आहे. या मोफत वैद्यकीय शिबीरासाठी अंदाजे २ हजार ते २ हजार ५०० ग्रामस्थ उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.



या शिबिरात दात तपासणी, पिबीएमएच्या एच व्ही देसाई आय हॉस्पिटल, पुणे यांच्या नेत्रतज्ञ आणि ऑप्टोमेट्रिस्ट्सद्वारे नेत्रतपासणी आणि चाचणी, टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथील कर्करोग तज्ञांकडून कर्करोग तपासणी, मधुमेह आणि रक्तदाब (बीपी) चाचणी, बाल विशेषज्ञांकडून मुलांची तपासणी, स्त्रिरोग, सांधे, गुडघा आणि पाठदुखी तपासणी, त्वचा तज्ञांद्वारे, तपासणी आणि सल्ला, मुळव्याध आणि फिशरसाठी कोलन आणि रेक्टल स्पेशलिस्ट तसेच आवश्यकतेनुसार मार्गदर्शन आणि समुपदेशन शिबिरात करण्यात येणार आहे. सहभागींनी स्लाइड शोद्वारे माहिती दिली जाईल. तंबाखूचे धोके यावर छायाचित्रे आणि अधिक माहिती दिली जाईल. तसेच योग्य लोकांद्वारे जागरुकता चर्चा, मार्गदर्शन आणि योग्य समुपदेशन तसेच, स्वत:ची काळजी, डायट, न्यूट्रिशन यावर चर्चासत्रे होणार आहेत.

कर्करोगाचा लवकर शोध घेणे महत्वाचे आहे. बऱ्याचदा, कॅन्सरसह अनेक रोग उशिरा अवस्थेत आढळतात, त्यामुळे उपचार आणि परिणामांमध्ये तडजोड होते. हे सर्व जागरुकतेच्या आभावामुळे होते, या शिबिरात समाविष्ट होऊ शकणाऱ्या विविध आजारांची तपासणी आणि उपचार हे उपलब्ध असलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने होतील. या शिबीराचे आयोजन गावकऱ्यांच्या वेदना दूर करण्यासाठी एक सेवाभावी प्रयत्न आहे.

## प्रवासादरम्यान चार लाखांच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल :** रेल्वेने प्रवास करून ऑनलाईन गाडी बुक करून घरी गेल्यानंतर बॅग नसल्याचे लक्षात आले आणि त्यातील चार लाखांच्या दागिन्याची चोरी करण्यात आली. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

३४ वर्षीय विघ्नेश नायडू हे सेक्टर २१, खारघर येथे राहतात. ते कुटुंबासह मदुराई येथे फिरण्यासाठी गेले होते. त्यानंतर मुंबईला परत येण्यासाठी मदुराई रेल्वे स्टेशनवर आलेल्या एक्सप्रेस गाडीने त्यांनी प्रवास सुरू केला. गाडी सीएसएमटी रेल्वे स्टेशन येथे पोहचली. त्यानंतर नऊ जणांचा ग्रुप असल्याने रेल्वे स्टेशन गेट येथून दोन ओला गाड्या ऑनलाईन बुक केल्या. त्यात सर्व बॅगा ठेवून ते राहत्या घरी खारघर येथे रात्री दहाच्या सुमारास पोहोचले. त्यावेळी त्यांच्याकडील बॅगांमधील एक मरून रंगाची ट्रॉली बॅग नसल्याचे लक्षात आले. त्यांनी या बॅगेचा शोध घेतला, मात्र ती सापडून आली नाही. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. त्यामध्ये जवळपास चार लाख रुपयांचे दागिने होते. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# नया दिन नयी रात @ ५०

## संजीवकुमारची नऊ रूपे केवढी तरी कौतुकाची

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

माणसाच्या आयुष्यातील नवरस आपणासही माहीत आहेत. आश्चर्य अथवा अद्भूत, भयानक, करुणा, क्रोध, रौद्र, बिभत्स, शृंगार, वीरता आणि आनंद वा हास्य. त्या त्या प्रसंगानुरूप ते भाव व्यक्त होत असतात. आणि याच सर्व भाव भावनाना एकाद्या कथा व पटकथेत गुंफले तर? चित्रपट कशावरही असू शकतो.

ही मूळ कल्पना दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटातील. तेथे १९६६ साली नवरात्री या नावाने तेलगू व तमिळ अशा दोन भाषेतील चित्रपट प्रदर्शित झाले आणि त्यावरूनच हिंदीत दिग्दर्शक ए. भीमसिंग यांनी नया दिन नयी रात (मुंबईत प्रदर्शित १० मे १९७४) पडद्यावर आणला त्याला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील... एव्हाना रसिकांची एक पिढी फ्लॅशबॅकमध्ये रमलीही असेल. चित्रपट व क्रिकेट अनेक भारतीयांना हमखास जुन्या आठवणीत नेतेच.

त्या काळात नवीन चित्रपटाचे पोस्टर ही त्याची पहिली ओळख असे. ते पाहून चित्रपट रसिकांचे विचारचक्र सुरू होई, या चित्रपटात काय बरे पहायला मिळेल, याची गोष्ट काय असेल? सामाजिक असेल की सस्पेन्स? की आणखी एखादी. 'नया दिन नयी रात'च्या पोस्टरवरील संजीवकुमारची एक दोन नव्हे; तर चक्क नऊ रूपे (विविध मुखवटे) पाहून माझ्यासारख्या अनेक चित्रपट रसिकांच्या मनात प्रश्न आला, एखाद्या हीरोच्या डबल रोलच्या चित्रपटांची पोस्टर पाहिली (चाणक्य दिग्दर्शित राम और श्याम'मधील दिलीपकुमार, मनमोहन देसाई दिग्दर्शित सच्चा झूठा वगैरे), अगदी नायकाच्या तिहेरी भूमिकेचे पोस्टर पाहिले (असित सेन दिग्दर्शित 'बैराग'मधील दिलीपकुमार), पण नऊ रूपातील संजीवकुमार आणि जोडीला जया भादुरी. काय असेल बरं या चित्रपटात?

रस्त्यावरची पोस्टर्स, होर्डींग्स, रेडिओ विविध भारतीवर या चित्रपटाचा रेडिओ कार्यक्रम यातून चित्रपट जवळ येत होता आणि आता 'नऊ भूमिकेत संजीवकुमार' हे चित्र स्पष्ट झाल्याने मुद्रित माध्यमातील बातम्यात वगैरे हा चित्रपट चर्चेत आणि म्हणूनच तर विशेष कुतूहल. विजय आनंद दिग्दर्शित जॉनी मेरा नाम (१९७०) आय.एस. जोहरची धमाल तिहेरी भूमिका. रामन्ना दिग्दर्शित 'हमजोली' (१९७०)मधील मेहमूदने पृथ्वीराज कपूर, राज कपूर व रणधीर कपूर या तीन पिढ्यांची धमाल नक्कल करीत रसिकांचे केलेले मनोरंजन. ही वेगळीच तिहेरी भूमिका असे काही संदर्भ समोर येत गेले, पण चक्क नऊ भूमिका?

मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर शालिमारला थिएटर डेकोरेशनवर ही नऊ रूपे लक्ष वेधून घेणारी होती. (त्या काळात असे थिएटर डेकोरेशन पाहत पाहत एक प्रकारचे थिएटर पर्यटन हादेखील आनंदाचा भाग असे. अशाच लहान लहान गोष्टीतील आनंदाने आपल्या देशात अगदी खालच्या माणसांपर्यंत चित्रपट नेला आणि रूजवला. त्यांची आठवण हवीच.)


'नया दिन...'ची मूळ गोष्ट ए.पी. नागराजन यांची, त्यावर ए. भीमसिंग यांनी पटकथेत माणसाच्या आयुष्यातील नवरस मांडलेत. नायिका सुषमा (जया बच्चन) हिच्या आयुष्यातील एकेका अडथळ्यात विविध रूपात तिला एकेक जण मदत करतो. त्या विविध व्यक्तीरेखा म्हणजेच संजीवकुमारची नऊ रूपे. त्यात वेडा डॉक्टर, रंगभूमीवरील कलाकार, कुष्ठरोगी, आपल्या भावाच्या खुनाचा बदला घेणारा डाकू अशी ती विविध रुपे आहेत. यांची नावे आनंद, स्वामी रहस्यानंद, सारंग, सेठ धनराज, शेरसिंग फुलकुमार वगैरे. संजीवकुमार कायमच अष्टपैलू व मेहनती कलाकार म्हणून ओळखला गेला. त्याला हा चित्रपट म्हणजे आपल्यातील गुणवत्ता दाखवायची खूपच मोठी संधीच मिळाली. खरंतर सुरुवातीस दिलीपकुमारला हा चित्रपट ऑफर झाला होता. दिलीपकुमारने एस.एच. रवैल दिग्दर्शित संघर्ष (१९६७)मध्ये संजीवकुमारसोबत भूमिका साकारताना त्याच्या गुणवत्तेचा अनुभव घेतला होता आणि त्याच कामाची जणू शाबासकी म्हणून दिलीपकुमारने 'नया दिन नयी रात'साठी संजीवकुमारचे नाव सुचवले आणि या चित्रपटाच्या सुरुवातीस आपल्या नेहमीच्या शैलीत निवेदनही दिले. (यश चोप्रा दिग्दर्शित त्रिशूल, नासिर हुसेन दिग्दर्शित जबरदस्त हेही चित्रपट सुरुवातीस दिलीपकुमारलाच ऑफर झाले होते. त्याच्या नकारानंतर संजीवकुमारला त्या व्यक्तीरेखा साकारायला मिळाल्या. एकाची भूमिका दुसऱ्याला, कधी तिसऱ्यालाच हे होतच असते. ती एक वेगळी रंगत.) 'नया दिन नयी रात' दिलीपकुमारने साकारला असता तर नायिका कोण? बहुतेक सायरा बानूच असती. नायिकेच्या अडचणीच्या प्रवासात विविध ठिकाणी नायक नवीन रूपात मदत करतो हे या थीममध्ये ही जोडी फिट्ट बसली असती.

संजीवकुमार व जया भादुरी (ती नंतर बच्चन झाली हो) यांनी भिन्न नात्यांतील व्यक्तीरेखा साकारलीय. गुलजार दिग्दर्शित 'परिचय'मध्ये वृद्ध पिता व त्यांची मुलगी, गुलजार दिग्दर्शित 'कोशिश'मध्ये पती व पत्नी, रघुनाथ झालानी दिग्दर्शित 'अनामिका'मध्ये प्रियकर व प्रेयसी (तरी तिची चार रूपे), रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'मध्ये वृद्ध सासरे व सून, ईस्माईल मेमन दिग्दर्शित 'नौकर'मध्ये नायक व नायिका, यश चोप्रा दिग्दर्शित 'सिलसिला'मध्ये संजीवकुमार डॉक्टर असून रेखाला त्याच्याशी लग्न करावे लागते. याचं कारण पतीचे (शशी कपूर) विमान अपघातात निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीला (जया बच्चन) आपल्या दीरासोबत (अमिताभ बच्चन) लग्न करावे लागते त्यातून हा दीर व त्याची प्रेयसी (रेखा) दुखावतात आणि दुरावतात. संजीवकुमार व जया बच्चन यांचा एकत्र काम करण्याचा रूपेरी पडद्यावरील प्रवास असा विविध नातेसंबंधाचा. 'नया दिन नयी रात'मध्ये अखेरीस ते विवाहबद्ध होतात तेव्हा संजीवकुमारची सहा रूपे या लग्नात हजर असतात. या चित्रपटात फरिदा जलाल, सुंदर, ललिता पवार, टूनटून, मनोरमा, श्यामा, डेव्हिड, नाझनीन व ओम प्रकाश यांच्याही भूमिका. चित्रपटाचे छायाचित्रणकार जी. विठ्ठल राव, तर आनंद बक्षी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत.

नऊ या आकड्यास खूप महत्त्व आहे. नवरात्रीत देवीची नऊ रूपे, तर आईच्या पोटात मुलं मोठे होण्यास नऊ महिने लागतात आणि त्यात 'नया दिन नयी रात'ची ही बहुचर्चित नऊ रूपे. या कॉमेडीच्या अंगाने खुललेल्या 'नया दिन नयी रात'ला सर्वसाधारण स्वरूपाचे यश लाभले. त्यापेक्षा जास्त रंजक चर्चा संजीवकुमारच्या नऊ भिन्न मुखवटा आणि व्यक्तीरेखांची झाली... तेच तर महत्त्वाचे असते. संजीवकुमार कधी नायक, तर कधी सहनायक रंगवत रंगवत वाटचाल करीत होता. महेश भट्ट दिग्दर्शित 'विश्वासघात'मधील पिता व पुत्र या दुहेरी भूमिकेतील टेलिफोनवरील संभाषणाचे दृश्य त्याच्या अभिनय वाटचालीतील सर्वात बहुचर्चित व सर्वोत्कृष्टही. संजीवकुमार स्टार नव्हे तर ॲक्टर. वयाची पर्वा न करता अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा साकारल्यात... मॅटीनी शो, मग व्हिडीओ, त्यानंतर मनोरंजन उपग्रह वाहिनी, आता यू ट्यूबवर 'नया दिन नयी रात'चा प्रवास सुरू आहेच, पण एकदा एन्जॉय करू शकता.


एकाच चित्रपटात एक नायक नऊ भूमिकेत असे मोहन सैगल दिग्दर्शित 'वो मै नहीं (१९७४)मध्येही होता (आचार्य अत्रे लिखित तो मी नव्हेच या बहुचर्चित नाटकाचे हे माध्यमांतर... अर्थात न जमलेले) यात नवीन निश्चल अशीच नऊ रूपे घेतो, पण त्यात रंगत नव्हती. तेथे संजीवकुमारच हवा. उगाच नाही हो 'नया दिन नयी रात'मधील संजीवकुमारची आजही उगाच चर्चा करीत नाहीत... पन्नास वर्ष पूर्ण होऊनदेखील संजीवकुमारची नऊ रूपे कौतुकास प्राप्त होताहेत हे उल्लेखनीय.












# प्रेरणास्रोत निरंकारी बाबा हरदेवसिंह महाराज

निरंकारी बाबा हरदेवसिंह महाराज यांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा प्राप्त करण्यासाठी दरवर्षी १३ मे हा दिवससंत निरंकारी मिशनच्या वतीने जगभर समर्पण दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने हा लेख...

सद्गुरूचा महिमा अपरंपार आहे. त्याचे वर्णन करण्यास कबीरांसारख्या महान संतांनीसुद्धा असमर्थता व्यक्त करताना म्हटले आहे की, साऱ्या धरतीचा कागद केला, सगळ्या वनस्पतीची लेखणी केली आणि सात समुद्रांची शाई केली तरीसुद्धा गुरुचे गुणवर्णन होऊ शकणार नाही. तरीदेखील भक्त आपल्या सद्गुरूचा महिमा, त्यांच्या उपकारांचे स्तवन करण्याचा आटोकाट प्रयास करीत असतात.

सदगुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे दिव्य आभायुक्त अद्भूत व्यक्तित्व आबालवृद्धांना समानरूपाने आकर्षित करीत राहिले. त्यांच्या दर्शनाने हृदय गदगदून गेल्याच्या अतीव प्रेमभावनेने ओतप्रोत अशा भक्तिरचना गात देश-विदेशातील भक्तगण त्यांच्या प्रति आपल्या प्रेमाची अभिव्यक्ती करीत असत. गुरूदेवांच्या दर्शनाची एक झलक किंवा त्यांचे हलकेसे स्मितसुद्धा भक्तांची हृदये तृप्त करुन टाकत.

बाबा हरदेवसिंह यांचा जन्म २३ फेब्रुवारी १९५४ रोजी दिल्ली येथे झाला. माता कुलवंत कौर आणि पिता बाबा गुरबचनसिंह यांचे अलोट प्रेम तर त्यांना मिळालेच, शिवाय शहनशाह बाबा अवतारसिंह आणि जगतमाता बुद्धवंती यांच्याही मायेची पाखर त्यांना लाभली, ज्यामुळे त्यांचे व्यक्तित्व आणखी उज्वल बनत गेले. दिल्लीतील रेडिओ कॉलनीमधील रोजरी पब्लिक स्कूलमध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले, तर पटियाला येथील यादवेंद्र पब्लिक स्कूलमध्ये त्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यांचे उच्च शिक्षण दिल्ली विद्यापीठामध्ये पूर्ण झाले.

अत्यंत विनम्र आणि शांत स्वभावाचे हरदेव युवावर्गात अत्यंत लोकप्रिय होते. त्यांनी सेवादलाची वर्दी घालून अनेक प्रकारच्या व्यवस्था सांभाळण्यात सक्रिय योगदान दिले.



१४ नोव्हेंबर १९७५ रोजी त्यांच्या विवाह सविंदर यांच्याशी झाला. २४ एप्रिल १९८० रोजी काही भ्रमित चित्ताच्या कट्टरपंथियांनी हरदेवसिंहांचे वडील गुरबचनसिंह यांच्यावर भ्याड हल्ला करून त्यांना शहीद केले. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण निरंकारी जगताला हादरवून टाकले. हरदेवसिंह यांचा जीवनप्रवाहही या घटनेने बदलून टाकला. अत्यंत विषम अशा त्या परिस्थितीमध्ये निरंकारी मिशनला एका खंबीर नेतृत्वाची गरज होती. त्याच वेळी हरदेवसिंह यांनी मिशनची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. सर्वप्रथम बाबा हरदेवसिंहांनी निरंकारी भक्तांच्या हृदयातील आक्रोश शांत केला. रक्तपात करण्याऐवजी रक्तदान करण्याचा निर्देश देऊन कोणाबद्दलही मनामध्ये बदल्याची भावना न बाळगण्याची शिकवण दिली. आज निरंकारी मिशन विश्वातील एक अग्रगण्य रक्तदान करणारी संस्था बनले आहे याचे श्रेय हरदेवसिंह महाराज यांच्या कुशल, दूरदृष्टीपूर्ण आणि दैवी नेतृत्वाला जाते. दिल्लीमध्ये निरंकारी सरोवर कॉम्प्लेक्सचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुशोभीकरण, तेथील दिव्य यात्रा नावाचे संग्रहालय आणि मानव एकतेची साक्ष देणारा 'एकत्व' नांवाचा फवारा हे बाबाजींच्या कलात्मक मार्गदर्शनाचे अत्युत्कृष्ट नमुने आहेत.

सद्गुरू ब्रह्मज्ञानरुपी अनमोल देणगी देऊन जगाला सुखी करतात. संत कबीरजींचे वचन आहे की...

गुरू समान दाता नहीं, याचक शिष्य समान।
तीन लोक की सम्पदा, सोगुरु दीन्हों दान।।

जगामध्ये ज्ञानासारखी परमपावन दुसरी वस्तु नाही. सद्गुरू ज्ञानरूपी नौकेमध्ये बसवून पाप्याहूनही पापी जीवाला भवसागरातून पार नेतात. जगामध्ये सद्गुरूहून अधिक दयाळू कोणी असू शकत नाही. श्रीमद्भगवत गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की, अर्जुना तू ज्ञानदृष्टीने सच्चिदानंदघन अशा मज परमात्म्याला पहा - अपि चेदसि पापेभ्य: सर्वेभ्य: पापकृत्तम:। सर्व ज्ञानप्लावेनैव वृजिन: सन्तरिष्यसि:।। (गीता-४/३६)अर्थात जरी तू पाप्यांहूनही पापी असलास तरी ज्ञानरुपी नौकेद्वारे नि:संदेह भवसागरातून तरून जाशील.

संत महात्म्यांनी सद्गुरूची जात विचारु नये असे म्हटले आहे. महत्व तलवारीला असते, म्यानाला नाही. तद्वत सद्गुरू जातीपातीच्या पलिकडे असून निर्मळ अशा मानवी मनामध्ये निवास करीत असतात. मानवाने त्याचाच आश्रय घ्यायला हवा. संत निरंकारी मिशन हे एक सार्वभौमिक मिशन आहे, सर्वांचे मिशन आहे. मानवतेचे मिशन आहे. अनेकतेत एकतेचे हे मिशन आहे.

सद्गुरू बाबा हरदेवसिंह महाराज स्वभावत:च मितभाषी होते. त्यांचे भोजन अल्प होते, मात्र निरंतर कार्यमग्न राहूनते सर्वाधिक कार्य करीत असत. वर्षातील तीन चतुर्थांश दिवस ते जगभरात कल्याणयात्रांवरच असत. त्यांच्या कल्याणयात्रांचा जास्तीत जास्त प्रवास सडक मार्गाने व्हायचा. तथापि, त्यांच्या चेहऱ्यावर थकवा किंवा असहजतचा लवलेशही कधी आढळला नाही. त्यांच्या दर्शनाने भक्तगणांना नवी ऊर्जा लाभे. साधे जीवन व उच्च विचार ही प्रेरणा देऊन मानवमात्राच्या प्रति कल्याणाची भावना व निराकार परमात्म्याच्या प्रति समर्पित होऊन जीवनप्रवास करण्याचे मार्गदर्शन बाबाजींकडून मानवजातीला मिळत राहिले.

१६ नोव्हेंबर २०१३ रोजी संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय सहनशीलता दिवसाच्या प्रसंगी दिल्लीमध्ये मिशनच्या वतीने आयोजित केलेल्या मोटरसायकल रॅलीला संबोधित करताना बाबाजींनी हजारो भाविक-भक्तगणांना सहनशीलता धारण करण्याची प्रेरणा दिली. आज मनुष्य ज्या प्रकारचे जीवन जगत आहे. त्यामध्ये प्रेम, करुणा आणि सहनशीलतेचा अभाव असल्याचे सांगून संकुचितपणा व स्वार्थाने भरलेल्या जगात सर्वांनी सहनशीलतेचा अंगिकारण्याचा आग्रह केला.

सहनशीलता असो किंवा मानवी मूल्यांचे अध:पतन. ज्या ज्या कमतरतांकडे बाबाजींनी निर्देश केला त्या दूर करण्यासाठी ते सातत्याने प्रयासरत राहिले. अद्वैत भावनेने युक्त होण्यासाठी एकत्व अंगिकारण्याची प्रेरणा त्यांनी निरंतर दिली. एकत्व हा मुख्य विषय समोर ठेवून २०१२मध्ये युकेमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय संत समागमामध्ये त्यांनी अखिल मानवजातीला एकत्वाच्या धाग्यात गुंफण्याचा संदेश दिला.

प्रत्येक मानवाने या दिव्य विभूतीकडून प्राप्त शिकवणुकीने उपकृत होऊन श्रेष्ठ मानवी जीवन जगण्याची आज नितांत गरज आहे.

**-हरजीत निषाद, दिल्ली**

# लेखिका तारा वनारसे



वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या तरीही बहुविध लेखन प्रकारात लेखनाचा व्यासंग असणाऱ्या डॉ. तारा वनारसे (तारा रिचर्डस) यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म १२ में १९३० रोजी पुणे येथे झाला. त्यांनी नाटक, कविता, कथा या प्रकारात साहित्य सेवा केली होती. त्यांच्या तीन पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले होते.

तारा वनारसे यांच्या आई या महर्षी कर्वे यांच्या आश्रमात वाढलेल्या बालविधवा होत्या. त्या आश्रमात हॉस्टेलवर देखरेख करीत असत. पुढे ताराबाईच्या आईने वनारसे यांच्याशी पुनर्विवाह केला. त्यांचे शालेय शिक्षण पुणे येथे झाले. त्यानंतर मुंबईत वैद्यकीय शिक्षण घेतल्यावर उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या. ब्रिटनमधील शिक्षण संपल्यावर वर्ष १९७० ते वर्ष १९७५ या काळात त्यांनी पुण्यात प्रॅक्टिस केली, मात्र त्यानंतर त्या इंग्लंडमध्ये स्थायिक झाल्या.

इंग्लंडमध्ये असतानाच डॉ. बेनौडिक्ट रिचर्डस (शल्यविशारद) यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. त्यांना मिरांडा ही मुलगी आहे. ताराचाईच्या सासूबाई ओलिव्हिए या इंग्लंडमधील सुसंस्कृत कुटुंबातल्या होत्या. डॉ. बेनोडिक्ट यांचे वर्ष १९९५मध्ये निधन झाले.

डॉ. तारा प्रसूतीतज्ज्ञ होत्या. त्या जरी वैद्यकीय व्यवसाय व अभ्यास करीत होत्या तरी त्यांचा साहित्याकडे ओढा होताच. त्यांचे लेखनही सुरू होते. त्यांनी लेखन सुरू केले त्यावेळी नवकथा बहारात येऊ लागल्या होत्या. १९६०नंतर मराठी कथेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यात पुरुष लेखकांबरोबर लेखिकांचा मोठा सहभाग आहे. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. तारा वनारसे, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सरिता पदकी, वसुधा पाटील अशी नावे आघाडीवर होती.

ताराबाईंच्या लेखनात कादंबरी किंवा नाटक हे प्रामुख्याने नायिका प्रधान होते. इंग्लंडमध्ये असताना तेथील सामाजिक क्षेत्रात मराठी साहित्य व महाराष्ट्रीय सांस्कृतिक चळवळीत सक्रिय होत्या. लंडन येथील महाराष्ट्र मंडळासाठी त्यांनी बरेच काम केले आहे. त्यांच्या कविता नवकाव्य प्रकारातील होत्या.

वर्ष १९५५मध्ये त्यांचे नायिकेच्या मनातील आंदोलने दर्शविणारे कक्षा हे नाटक प्रसिद्ध झाले, त्या वेळी त्यांचे वय २५ वर्षे होते. या नाटकाचा पहिला प्रयोगही वर्ष १९५५मध्ये म्हणजे ताराबाईंच्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी झाला. नाटकाचा पहिला प्रयोग ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांच्या कलाकार नाट्यसंस्थेने केला. त्यात स्वतः आत्माराम भेंडे (दिग्दर्शक), आशा भेंडे, कुसुम कुलकर्णी आणि सुधाकर कुलकर्णी यांनी भूमिका केल्या होत्या. प्रेक्षकांना हे नाटक खूपच आवडले. वयाच्या ८०व्या वर्षी इंग्लंडमधील हेमेल हेम्पस्टेड येथे १२ मे २०१० रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# पोलादपूरमध्ये गृह प्रकल्पाचा शुभारंभ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीच्या हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत उंबरकोंड पार्टे कोंड रस्त्यालगत ७२० सदनिकांचा प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच म्हाडाच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्याचा शुभारंभ अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर भूमिपूजन करून झाला असून केवळ १२ लाखांमध्ये लाभार्थ्यांना सदनिका उपलब्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याची तसेच रेराच्या नियमानुसार ११ हजारांचा चेक जमा करण्याची आवश्यकता असल्याची माहिती प्रकल्पाचे प्रमुख मार्गदर्शक संदीप पालकर यांनी दिली.



या वेळी प्रकल्पाचे प्रमुख संचालक हनुमंत सावंत, रामदास कळंबे, मच्छींद्र पाटील, विनोद म्हात्रे, मनोहर चोपडे, ललित बेंडखळे, श्रीकांत पोतदार, तळेकर, सुतार उपस्थित होते.

या वेळी प्रकल्पाचे प्रमुख मार्गदर्शक संदीप पालकर यांनी सपत्नीक भुमिपूजन केल्यानंतर मान्यवरांच्याहस्ते कुदळीने खणून कामाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी व्यासपिठावरील मान्यवरांनी लाभाथाअसाठी आश्वासक भाषणे केली.

या वेळी आठ बँकांसोबत टायअप असलेल्या मोरे यांनी, बँकांचे कॅम्प याठिकाणी उभारून लाभार्थ्यांचे केवळ कागदपत्रच नव्हे तर चेहरे पाहूनही कर्जफेडीची त्यांची प्रामाणिक भुमिका पाहून सदनिका विकत घेण्यासाठी स्पॉट लोनसारखे तातडीने कर्ज उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासन दिले.

काही सामाजिक कार्यकर्त्यांनी लाभार्थ्यांच्या वतीने विविध प्रश्न विचारले. यामध्ये दत्तोपंत साळुंखे सरांनी रेराच्या नियमानुसार ११ हजार रुपये भरण्याच्या नव्या भुमिकेबाबत साशंकता व्यक्त केली तर अन्य एका महिलेने लोहारमाळ ते पोलादपूरदरम्यान कोणतेही दुकान नसल्याने या प्रकल्पांतर्गत दुकानगाळे उभारले गेल्यास स्थानिक ग्रामस्थांना बाजारहाट करण्याची सुविधा उपलब्ध होईल, अशी सूचना केली. ग्रामस्थाने पावसाळ्यापूर्वी पायऱ्या आणि रस्त्यालगतचे गटार बांधण्याची सूचना केली.

प्रकल्पाचे प्रमुख संचालक हनुमंत सावंत यांनी शेवटी कोरोनापूर्वी या कामाची सुरूवात करण्याचा मानस असताना राज्य आणि केंद्रसरकारमधील वादग्रस्त परिस्थितीमुळे हा प्रकल्प दोन वर्षे लांबला असून आता कालबध्द नियोजन करून या प्रकल्पाचे काम केवळ १८ महिने ते २ वर्षांच्या कालावधीमध्ये पूर्ण करायचे आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता तातडीने केल्यास त्यांचे प्राधान्य कायम राहिल. आतापर्यंत २०९ लाभाथाअचे अर्ज पूर्ण असून उर्वरित सदनिकांसाठी अर्ज भरून घेण्याचे काम सुरू केले जाणार आहे. नव्या अर्जदारांमध्ये कागदपत्रांची पूर्तता व ११ हजाराचा चेक देणाऱ्यांना अपूर्ण लाभार्थ्यांच्या तुलनेत आधी संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आधी कागदपत्रे पूर्ण करण्याचे आवाहन सावंत यांनी केले. या वेळी रामदास कळंबे यांनी ७२० सदनिकांचा प्रकल्पाच्या उभारणीस शुभेच्छा देताना पोलादपूर तालुक्यात अधिकाधिक मध्यमवर्गीय लोकांना सदनिका मिळण्यासाठी आम्ही तसेच आमदार भरत गोगावले यांचेही सहकार्य मिळेल, अशी ग्वाही दिली.

# कोपरी ते आसरोटी रस्त्यावर धुळीचे साम्राज्य



**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

आज रस्त्यांचे स्वरूप बदलत चालले असताना रस्ते उत्तम होत आहे, मात्र यासाठी पर्यायी मार्ग हा वाहन चालकांस दिला जातो, मात्र हा रस्ता अनेकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. लोहप चौक या मार्गावर सातत्याने वाहनांची रेलचेल असते, यामुळे या रस्त्यांचे काम सध्या सुरू, मात्र या कोपरी ते आसरोटी येथील अंतर साधारणपणे एक किमी माळरानावरून रस्ता करून दिला असला तरीसुद्धा वाहनांच्या मुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होत असल्यामुळे श्वसनांचे त्रास होण्याची समस्या गंभीर बनत आहे.

या रस्त्यावर ठेकेदाराने पण्याचा शिडकाव करणे गरजेचे असल्याचे वाहनचालकांची मागणी आहे. हवेत सातत्याने धूळ निर्माण होऊन समोरील वाहन दिसत नाही. यामुळे अपघातांची समस्या गंभीर बनत आहे, मात्र रात्रीच्या वेळी अपघाताची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

तात्पुरता बनविलेला रस्ता उत्तम दर्जाचा नाही. फक्त प्रवासी वर्गांची समजूत काढावी या दृष्टिकोनातून निर्माण करण्यात आला आहे. काही ठिकाणी चढण, तर काही ठिकाणी तीव्र उतरण त्यांच बरोबर खाच खड्डे असा मार्ग तयार करून दिल्यामुळे या मार्गवर नित्यनेमाने प्रवास करणारे कामगार, शेतकरी, वयोवृद्ध, तसेच आजारी व्यक्तींना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

मागील दोन आठवड्यापासून या ठिकाणी या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण सुरू असल्यांचे समजते. यामुळे, अनेकांना या पर्यायी मार्गांचा वापर करून धुळीचा सामना करावा लागत आहे.

या ठिकाणी वाहन जात असतांना धूळ मोठ्या प्रमाणात उडत असल्यामुळे या मार्गावरून प्रवास करू की नये? असा प्रश्न सध्या निर्माण होत आहे, मात्र दुसरा पर्याय नसल्यामुळे याच मार्गाचा अवलंब केला जातो, परिणामी उत्तम रस्ते पूर्ण झाल्याशिवाय पर्याय नसल्याने ह्याच मार्गावरून प्रवास केला जात असल्यामुळे अपघाताची दाट शक्यता प्रवासी वर्गाकडून वर्तवली जात आहे. सदरचा रस्ता ठेकेदाराने तातडीने तयार करावा, अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाज नवीन जागेत सुरू

**पेण : प्रतिनिधी**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण कार्यालयाचे सर्व कामकाज शुक्रवार (दि. १०)पासून जिते येथील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले असून वाहन व अनुज्ञप्ती संदर्भातील सर्व कामकाजासाठी जनतेने शुक्रवारपासून जिते या ठिकाणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण (०२१४३-२५२२३४) वर संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी केले आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण कार्यालयास गट नं. २८/१, मौजे जिते, ता. पेण या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या शासकीय जागेत रस्ता सुरक्षा हॉल व कार्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून २३ मार्च २०२४ रोजी परिवहन आयुक्त, विवेक भीमनवार यांच्या हस्ते या इमारतीचा उद्घाटन सोहळा झाला आहे.

पेण-खोपोली बायपास रोड तसेच विकासस्मृती या इमारतीमध्ये सुरू असलेले अनुज्ञप्नी विभागाचे सर्व कामकाज २९ एप्रिल २०२४ पासून जिते येथील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. वाहन मालक, चालक तसेच नागरिकांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे, जिते येथील नवीन इमारतीत सर्व कामकज सुरळीत होईपर्यंत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माणगावजवळ वाहनांचा अपघात

## दुचाकीस्वार जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पासून ९ किमी अंतरावर असणाऱ्या इंदापूर गावाच्या हद्दीत मुंबई-गोवा महामार्गावर बोलेरो पिकअप व बोलेरो दुचाकीत समोरासमोर धडक लागून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी होवून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघात शनिवारी (दि. ११) पहाटे ३.३० वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची विराज रामभाऊ गुरव (वय ३१, रा. वाघोटन जिल्हा सिंधुदुर्ग) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.



अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, या अपघाताची फिर्याद देणारे विराज रामभाऊ गुरव हे त्यांच्या ताब्यातील बोलेरो पिकअप (एमएच ०७ एजे २५७५* ही गाडी गोवा बाजूकडून मुंबई बाजूकडे माणगाव मार्गे चालवीत घेऊन जात असताना त्यांची गाडी इंदापूर गावच्या हद्दीत आल्यावर समोरून मुंबई बाजूकडून गोवा बाजूकडे येणाऱ्या बुलेट मोटरसायकल (एमएच ०३ सीजे ६९६९) या गाडीची समोरासमोर धडक लागल्याने अपघात झाला. या अपघातात मोटरसायकल स्वार सचिन विजय बद्रिके वय ३५ राहणार भांडूप मुंबई हा जखमी होवून दोन्ही वाहनाचे नुकसान झाले या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात मोटर अपघात रजि नं. १३/२०२४ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे. अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दोडकुलकर हे करीत आहेत.

# अन्नपदार्थांबाबत वार्षिक परतावा भरण्याची मुदत ३१ मेपर्यंत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सर्व उत्पादक व आयातदार अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षा मानदे कायद्या नुसार त्यांच्या आस्थापनेत उत्पादित अथवा आयात केलेल्या अन्नपदार्थांबाबत वार्षिक परतावा सादर करणे बंधनकारक असून उत्पादक व आयातदार अन्न व्यवसायिकांना वार्षिक परतावा भरण्याची मुदत ३१ मे २०२४ पर्यंत आहे.

सर्व उत्पादक व आयातदार पेढयांनी आपला वार्षिक परतावा ३१ मे २०२४ पर्यंत अगोदरच foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करावा. ३१ मे २०२४ नंतर अन्न परतावा दाखल केल्यास प्रती दिन १०० रुपये अशी दंडाची आकारणी करण्यात येते याची उत्पादक व आयातदार अन्न व्यवसायिकांनी नोंद घ्यावी, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन पेण नि.दि. मोहिते यांनी कळविले आहे.

# वाहतूक कोंडीमुळे चाकरमान्यांना बसतोय फटका

## इंदापूर, माणगाव शहरात जाणाऱ्यांना प्रवाशांना रोजची डोकेदुखी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव व इंदापूर शहरातील बाजारपेठेतील रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होत नाही. त्यामुळे या शहराच्या दोनही बाजूला मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच रांगा लागल्या असल्याने तब्बल एक महिन्यापासून वाहतूक कोंडीचा फटका प्रवासी पर्यटक नागरिकांना नाहक बसत आहे. त्यामुळे इंदापूर व माणगावमधील नागरिकांची डोकेदुखी अधिकच वाढली आहे.



शनिवार-रविवार ही नित्याचीच वाहतूक कोंडी असते. त्यातच हॉलीडे आणि उन्हाळी सुट्ट्या व यावर्षीची सुरू असणारी लगीनघाई यामुळे मुंबई, ठाणे, पुणे, सुरत येथे व परिसरात असणारा पर्यटक व चाकरमानी मोठ्या प्रमाणात कोकण व तळ कोकणात परतला आहे. उष्णतेने व्याकूळ झालेल्या पर्यटकांनी श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, मुरूड, काशीद बीच यासह अनेक ठिकाणी समुद्रात भिजण्यासाठी मोठ्या प्रमाणात गेले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका सर्वांनाच बसला आहे.

ही वाहतूक कोंडी नित्याचीच होत असून नागरिकांची चांगलीच डोकेदुखी बनली आहे. या बाजारपेठेतील रस्ता कधी मोकळा श्वास घेणार? असा मार्मिक सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. लोकसभेची निवडणुक रायगड व रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील पार पडली असली तरी प्रवासी नागरिकांचीही लगबग काही कमी झाली नाही. त्यातच शाळा विद्यालयाच्या परीक्षा आटोपल्या नंतर गावी जाण्याची लगबग सुरू झाली त्यातच लग्नसराई सुरू झाल्याने नागरिकांनी गावाकडे कूच केली आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेत पुन्हा वाहतुकीची कोंडी झाली असून त्याचा फटका नागरिकांना बसला आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाल्याने पर्यटक नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली असून सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवसभर माणगावात वाहतूक कोंडी महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली. याचा फटका प्रवासी नागरिकांना चांगलाच बसला असून या वाहतूक कोंडीचे कोडे कधी सुटणार? हा प्रश्न नागरिकांना भेडसावत आहे.

पुणे व पश्चिम महाराष्ट्रातून पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी रायगडात आले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने दरम्यानच्या काळात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. त्यामुळे पर्यटक नागरिकांच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणीच पडले. कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. दर शनिवारी-रविवारी माणगाव व इंदापूर येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते. या दोन्ही बाजारपेठेला बायपास काढण्याचे काम गेले अनेक वर्षापासून सुरू असून ते काम रखडले असल्याने नागरिकांना याचा नाहक फटका बसत आहे.

सकाळपासूनच मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव, इंदापूर या शहरात वाहतूक कोंडी झाली आहे. उन्हाळ्याचे सुट्या असल्याने महामार्गांनी प्रवासी नागरिकांच्या वाहनांच्या रांगा लागल्यामुळे वाहतूक संत गतीने सुरु होती. मुंबई - गोवा महामार्गावर मुंबई बाजूकडून वाहनाच्या रांगा महामार्गावर दिसत होत्या. पुणे बाजूकडून समुद्र व पर्यटना स्थळावर मौज मजा करण्यासाठी आपल्या कुटुंब व मित्रासह ग्रुप वर्षा सहलीसाठी मोठ्या प्रमाणांत आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच या वाहतुक कोंडीचा फटका बसला. मुंबई - गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव येथील बायपासचे काम पूर्ण झाल्यास माणगावमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटेल, अशी आशा नागरिकांना वाटत असून हि वाहतूक सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच महामार्ग पोलीस व माणगाव पोलीस विशेष प्रयत्न करीत आहेत.

# सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, हे गौरीनंदन अपार्टमेंट, गणेशमंदीर शेजारी, विजय नगर, वरसोली-अलिबाग, जि. रायगड येथे कार्यरत आहे. या वसतिगृहाची मान्य संख्या ७५ आहे.

ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांचे सहीचा सन २०२३-२४ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, बँक खाते पासबूक झेरॉक्स, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईज फोटो- २ आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, अलिबाग एस.एफ. कदम यांच्याशी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल एस.एफ.कदम यांनी केले आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांनीही केली मतदान जनजागृती



**चौक : प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आदेशाने मतदान जनजागृती कार्यक्रम अनेक माध्यमांद्वारे होत असुन शासकीय कर्मचारी हेही मतदान जनजागृती करीत आहेत.

देशात लोकसभा निवडणुक जाहीर झाली असून देशात काही ठिकाणी मतदान झाले आहे. ज्या ठिकाणी मतदान झाले नाही, तेथे मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामसेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका मदतनीस, शिक्षक यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मतदान का आणि कशासाठी करावे, मतदानाचा अधिकार, लोकशाही याविषयी प्रभात फेरी, काढून जनजागृती करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सीआरपी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, मदतनीस, सर्व महिला बचत गटाचे अध्यक्ष व सचिव, बचत गट सदस्या, ग्रामपंचायत कर्मचारी सहभागी झाले होते. या वेळी वेळी मतदान जनजागृती शपथ व गावातून मतदान जनजागृती बाईक रॅली असा कार्यक्रम घेण्यात आला.

# मावळ मतदारसंघात शासकीय, खासगी कर्मचाऱ्यांना मतदानासाठी भरपगारी रजा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघात क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदार करता यावे यासाठी सोमवार १३ मे २०२४ रोजी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ ब नुसार भरपगारी रजा देय असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हातील मावळ लोकसभा मतदार संघात चौथ्या टप्प्यात सोमवार १३ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदार संघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, यासाठी अशा सर्व मतदारांना लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ ब नुसार भरपगारी रजा देय आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व आस्थापना प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी अथवा कर्मचारी अथवा रोजंदारी कर्मचारी यांना सोमवार दिनांक १३ मे रोजी भरपगारी रजा मंजूर करण्याचे आदेश पुढील शर्ती अथवा अटीस अधिन राहून देय आहे. १) हा आदेश शासकीय आस्थापना अथवा खासगी आस्थापना अथवा रोजंदारीवरील कर्मचारी आस्थापना अथवा दुकाने अथवा कंपनी अथवा अशा सर्व आस्थापनांना लागू आहे. २) ज्या आस्थापनांमध्ये उक्त कामगारांचे अनुपस्थितीमुळे उक्त आस्थापनांचा धोका निर्माण होऊ शकतो अथवा मोठ्या प्रमाणात तोटा होऊ शकतो अशा कर्मचाऱ्यांसाठी लागू नाही.

आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापना प्रमुख हे उक्त कलमाचे १३५ ब (२) नुसार कारवाईस पात्र राहतील. सदरहू आदेश हा अन्य जिल्ह्यात काम करणाऱ्या परंतु जिल्ह्याच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या आस्थापना प्रमुखांनाही लागू होत आहे, असेही आदेशात म्हटले आहे.

# अबकी बार नरेश म्हस्के खासदार!

## नवी मुंबईत भाजप पदाधिकाऱ्यांचा निर्धार

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि. ११) नवी मुंबई भाजप जिल्ह्याच्या वतीने कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. मोदीजींना पंतप्रधान बनवण्याकरता चारसो पार जागा जिंकण्याचे ध्येय प्राप्त करण्यासाठी नरेश म्हस्के यांना मताधिक्क्याने जिंकून देण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.



या बैठकीला आमदार गणेश नाईक, उमेदवार नरेश म्हस्के, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर तथा ऐरोली विधानसभा निवडणूक प्रमुख सागर नाईक आमदार रवींद्र फाटक, भाजप माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, युवा नेते वैभव नाईक, बेलापूर विधानसभा निवडणूक प्रमुख निलेश म्हात्रे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष प्रा. वर्षा भोसले यांच्यासह नवी मुंबई भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सुपर वॉरियर्स, बूथ अध्यक्ष, प्रकोष्टप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीची प्रस्तावना नवी मुंबई, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केली. २०१९ पासून नवी मुंबईमध्ये भाजप संघटन अधिक मजबूत झाले. २०० पेक्षा जास्त कार्यक्रम झाल्याचे जिल्हाध्यक्ष नाईक यांनी सांगितले. भाजपच्या माध्यमातून जनतेची सेवा घडली. नवी मुंबईतील नागरिक सुजान आणि विचार करणारे आहेत. कोरोना काळामध्ये लोकनेते गणेश नाईक यांनी तब्बल ७५ वेळा बैठका घेऊन हे शहर सुरक्षित ठेवण्यासाठी काळजी घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली नरेश म्हस्के यांना विक्रमी मताधिक्याने निवडून देण्यासाठी सर्वजण प्रयत्न करणार आहेत.

लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी मार्गदर्शन करताना जगामध्ये भारताचा मान सन्मान वाढवण्यासाठी आणि देशातील सर्व घटकांचा विकास करण्यासाठी मोदीजींना पुन्हा एकदा पंतप्रधान करायच आहे, असे आवाहन केले. देशाच्या विकासाची गती पंतप्रधान मोदीच कायम ठेवू शकतात. महायुतीचे उमेदवार म्हस्के यांच्या विजयासाठी कामाला सर्वांनी गती द्यावी.

उमेदवार नरेश म्हस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नाईक साहेबांच्या नेतृत्वामुळे सुनियोजित नवी मुंबई शहर घडल्याचा गौरव केला. नाईक साहेबांएवढा मनाचा मोठेपणा कुणाकडेच नसून त्यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवत आहे. मला विजयाची खात्री असून मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी म्हस्के एक साधन आहे. नाईकसाहेबांचा विश्वास सार्थ ठरवू, असेही उमेदवार म्हस्के म्हणाले.

या बैठकीमध्ये नेरूळ आणि कोपरखैरणे येथील काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

## नवी मुंबईत महायुतीचा मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण महाराष्ट्रभर लोकसभेचा रणसंग्राम सुरू असून बुधवारी (दि. ८) सानपाडा येथील चंदन बँक्वेट हॉल येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत बेलापूरमधील नवी मुंबई महायुती पदाधिकारी मेळावा झाला.




या वेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा, शहर प्रमुख विजय माने, मनसे प्रमुख गजानन काळे, भाजप प्रदेश संयोजक सतीश निकम, रा.कॉ. पा. नवी मुंबई अध्यक्ष नामदेव भगत, रा.कॉ.पा. नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्षा शोभा चौगुले, रा.कॉ.पा. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुनिता देशमुख, राष्ट्रीय समाज पक्ष यशवंत सेनेचे अध्यक्ष अभिजित कोकरे, माजी भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेविका सरोज पाटील, भाजप उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश रॉय, दत्ता घंगाळे, पांडुरंग आमले, राजू तिकोने, विकास सोरटे, जगनाथ जगताप तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने महायुतीच्या उमेदवारासाठी काम करण्याचे आदेश आमदार मंदा म्हात्रे यांनी उपस्थितांना दिले. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, युक्रेनमध्ये शिक्षणासाठी भारतातील विद्यार्थी मोठ्या संख्येने गेले होते. जवळपास २० हजार विद्यार्थी युक्रेनच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये अडकले होते. या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केलेल्या प्रयत्नांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून ऑपरेशन गंगा नावाची मोहीम सुरू करण्यात करून त्या अंतर्गत युक्रेनमधील भारतीय दुतावास विद्यार्थ्यांच्या सातत्याने संपर्कात राहून त्यांना पुन्हा भारतात आणण्याचे काम करण्यात आले.

भविष्यात या भागाचा सर्वांगीण विकास करायचा असेल आणि प्रगती साधायची असेल पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे हात बळकट करायला हवे व अबकी बार ४०० पार फिर एक बार मोदी सरकार हे उद्दिष्ट पूर्ण करायचे असेल तर महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले आहे.

## बापाने मुलीवर केला लैंगिक अत्याचार

**नवी मुंबई :** दिघा परिसरात राहणाऱ्या १४ वर्षीय मुलीवर तिच्याच वडिलांनी चार वर्षांपूर्वी लैंगिक अत्याचार केल्याची घटना बुधवारी (दि. ८) उघडकीस आली आहे. त्यानंतर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी पीडित मुलीच्या वडिलांवर बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील पीडित मुलगी काही दिवसांपूर्वी गोवंडी शिवजीनगर येथे राहणाऱ्या मामाच्या घरी गेली होती. त्यावेळी मुलीने दिघा येथे घरी जाताना आपल्या वडिलांनी २०२० मध्ये आपल्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे सांगितले. त्यानंतर मुलीच्या मामाने शिवाजीनगर पोलिसांत वडिलांविरोधात तक्रार दाखल केली. हा गुन्हा नवी मुंबईत दिघा परिसरात घडल्याने शिवाजीनगर पोलिसांनी हे प्रकरण पुढील तपासासाठी रबाळे एमआयडीसी पोलिसांकडे शुक्रवारी (दि. ९) वर्ग केले आहे. अद्याप या प्रकरणातील आरोपी वडिलांना अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## दिशाभूल करणारा संदेश पाठविणाऱ्याविरोधात तक्रार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा क्षेत्रात मतदारांना चुकीचे लघुसंदेश पाठवून त्यांची दिशाभूल करणाऱ्या एका अनोळखी व्यक्ती विरोधात निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सक्तीचे पाऊल उचलले आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात रीतसर निवडणूक आयोगाचे काम करणाऱ्या पनवेल पालिकेच्या अधिकाऱ्याने तक्रार नोंदविली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या अदखलपात्र गुन्ह्यामध्ये मतदार यादीतील जी नावे बाद झाली आहेत किंवा ज्या मतदारांच्या नावावर 'डिलिट' असा शिक्का लागला आहे अशा मतदारांची फसवणूक करण्याचा प्रयत्न एका अनोळखी व्यक्तीने केला आहे. ज्या मतदारांची नावे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केलीत अशा मतदारांनी त्यांची जुनी मतदानकार्ड दाखविल्यास अशांना मतदानाची संधी मतदान केंद्रावर दिली जाईल, असा लघुसंदेश सर्वत्र पसरविण्यात आला आहे.

या संदेशाविरोधात निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी पोलिसांत रितसर तक्रार केल्याची माहिती मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके यांनी दिली. ज्या मतदारांना निवडणूक यादीतून बाद केले आहे अशांना निवडणूकीचा अधिकार नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त अभिवादन



**नवी मुंबई : बातमीदार**

सामाजिक समतेचे पुरस्कर्ते, द्रष्टे समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील म्फिथिएटर येथे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, परिमंडळ २चे उपआयुक्त चंद्रकांत तायडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात व नैनेश बदले, शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे आणि इतर अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी अभिवादन केले.

## चिरनेरमध्ये संभाजी महाराज जयंती सोहळा

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील चिरनेर या इतिहास प्रसिद्ध गावातील कातळपाडा येथील दत्त मंदिराच्या प्रांगणात छावा प्रतिष्ठानतर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जयंती उत्सव सोहळा मंगळवारी (दि. १४) ऐतिहासिक वातावरणात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती, छावा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुभाष कडू यांनी दिली. सध्या या सोहळ्याची जोरदारपणे तयारी सुरू असून, छावा प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते पूर्व तयारीच्या दृष्टीने कामाला लागले आहेत. यात प्रामुख्याने छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती रेवसकर यांच्या हस्ते करण्यात येईल. या वेळी जन्म सोहळ्याचे पाळणा गीत सादर करण्यात येईल.

या वेळी आयोजित करण्यात आलेल्या सत्यनारायणाच्या महापूजेचा मान सरिता योगेश खारपाटील यांना देण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांची पालखी मिरवणूक हे या सोहळ्याचे आकर्षण असणार आहे. या पालखी मिरवणुकीत शिवप्रेमीं बरोबर ग्रामस्थ तसेच हभप गणपत महाराज, हभप हासूराम बाबा महाराज यांच्या अध्यात्मिक पौर्णिमा मंडळाचे वारकरी, माऊली हॉर्स फार्मचे प्रशांत घरत सहभागी होणार आहेत. या वेळी महिला लेझीम पथकाची झळक पाहायला मिळणार आहे. सायंकाळी सात वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

या महाप्रसादासाठी अन्नदाते तेजस डाकी यांचे सौजन्य लाभले आहे. रात्री ९ वाजता बळवली येथील हभप अमित महाराज यांचे कीर्तन होईल. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## फ्लेमिंगो वाचवण्यासाठी मूक मानवी साखळी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील या फ्लेमिंगो सिटीमध्ये शनिवारी (दि. ११) हरित गटांनी जागतिक स्थलांतरित पक्षी दिन साजरा केला आणि फ्लेमिंगो घरे-पाणथळ जागा-यांमध्ये वावरू नका, असा संदेश देत मूक मानवी साखळी आंदोलन केले. सेव्ह डीपीएस फ्लेमिंगो लेकची घोषणा करणारे एक मोठे बॅनर आणि फलक हातात घेऊन, मूक आंदोलकांनी आवाजहीन पक्षी पाहुण्यांसाठी त्यांचा एकजुटीने आवाज उठवत घोषणा दिल्या.




निसर्गाच्या सौंदर्याला मारून टाकू नका; फ्लेमिंगो शहराशिवाय फ्लेमिंगो शहर?, पाणथळ जागा पडीक जमिनी नाहीत; पंख असलेल्या चमत्कारांना संरक्षण आवश्यक आहे; फ्लेमिंगोसाठी उंच उभे राहा: त्यांच्या अभयारण्याचे रक्षण करा असेदेखील फलकांवर लिहिले होते. नेरूळ जेट्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रवासी जलवाहतूक टर्मिनलच्या बांधकामा मुळे तलावाच्या दक्षिणेकडील मुख्य वाहिनी गाडली गेली होती, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी निदर्शनास आणून दिले.

गेल्या एका महिन्यात, सरोवरात उतरलेल्या फ्लेमिंगोचे १० हून अधिक फ्लेमिंगो मरण पावले आणि पाच जखमी झाले, असे ते म्हणाले. कुमार म्हणाले, आम्ही विविध स्तरांवर आवाज उठवत आहोत आणि सरकारने जबाबदारी निश्चित करण्याची आणि तलाव पुनर्संचयित करण्याची वेळ आली आहे, कुमार म्हणाले.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय तसेच मुख्यमंत्र्यांनी नॅटकनेक्टच्या तक्रारीला प्रतिसाद दिला आणि तलावातील पाणी अडवण्याच्या चौकशीचे निर्देश दिले, परंतु अद्याप जमिनीवर कोणतीही कारवाई झालेली नाही, असे कुमार म्हणाले. नवी मुंबई एन्व्हायर्नमेंट प्रिझर्व्हेशन सोसायटीचे संदिप सरीन म्हणाले की, उल्लंघन हे न्यायालयाच्या अवमानाचे स्पष्ट प्रकरण आहे आणि संस्था आपल्या वकिलांशी सल्लामसलत करत आहे.

## वकील संघटनांतर्फे चर्चासत्र

**पनवेल : प्रतिनिधी**

भारतीय संविधान बदला बाबतच्या निरर्थक चर्चा सामाजिक स्वास्थ्यासाठी घातक या विषयावर चर्चासत्र वकील संघटनांतर्फे शुक्रवार (दि. १०) पनवेल येथील न्यायालयात आयोजित करण्यात आले होते.



न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या चर्चा सत्रास पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष तथा अधिवक्ता परिषदेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मनोज भुजबळ, उपाध्यक्ष संदीप जगे साहेब, सचिव प्रल्हाद खोपकर व अधिवक्ता परिषदेचे रायगड जिल्हा महामंत्री सुनील तेलगे उपस्थित होते.

या वेळी अधिवक्ता विनायक कोळी, संघराज गायकवाड व मानवेंद्र वैदू यांनी भारतीय संविधान बदला बाबतच्या निरर्थकचर्चा सामाजिक स्वास्थ्यासाठी कशा घातक आहेत याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले. अधिवक्ता परिषदेचे कार्यालयीन सचिव मनोज म्हात्रे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष तथा अधिवक्ता परिषदेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मनोज भुजबळ यांनी केले. या कार्यक्रमास सुमारे ४० अधिवक्ता उपस्थित होते.

## दि.बा. मोकाशी यांच्या कथेचा नाट्याविष्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

जन्म मृत्यू या अटळ आणि एक अविरत असे जीवनाच अंग आहे. रामजीच्या मुलाचे जाणे आणि गाईच्या उदरातून पाडस जन्माला येणे या प्रकृतीच्या सामान्य जीवनसातत्यावर तात्वज्ञानिक भाष्य करणारा हा एक अनोखा नाट्यविष्कार रसिकांना मंत्रमुग्ध करून गेला.




अक्षय शिंपी आणि नेहा कुलकर्णी यांनी 'आता आमोद सुनासी आले' या दि. बा. मोकाशी यांच्या कथेचा दास्तानगोई या रूपात सादर केलेला हा कलाविष्कार परका न वाटता टाळ आणि अभंगाच्या सुंदर मिश्रणामुळे दास्तानगोई हा फॉर्म परका न वाटता अगदी मराठमोळा वाटतो. म्हणूनच रसिकांची भरभरून दाद मिळाली.

मराठी साहित्यात, नाटकात अभिनवता, प्रायोगिकता यांना प्रोत्साहन मिळालं पाहिजे, ते लोकांपर्यंत पोहचले पाहिजे याकरिता अन्वय प्रतिष्ठान, स्त्री मुक्ती संघटना आणि प्रभात नेत्र चिकित्सालय यांच्या वतीने या प्रयोगाचे आयोजन केल्याचे आपल्या प्रस्तावनेत डॉक्टर अजित मगदूम यांनी सांगितले.

या प्रयोगानंतर जाणकार रसिकांच्या, चित्र-नाट्य कलावंतांच्या प्रतिक्रिया-प्रतिसादाला धरून अक्षय आणि नेहानी सुंदर चर्चा घडवून आणली. या वेळी डॉ प्रशांत थोरात, ज्योती म्हापसेकर, वृषाली मगदूम, सुभाष कुलकर्णी लोकसेवा आयोगाचे सदस्य दिलीप पांढरपट्टे, अभिनेते अशोक पालवे, सावित्री मेधातुल, कवी जितेंद्र लाड, गजानन म्हात्रे, निवेदिका डॉ. मृण्मयी भजक, अनिल लाड, नाटकाची आवड असणारे दिघा येथील विद्यार्थी आणि स्त्री मुक्ती संघटनेच्या अनेक कार्यकर्त्या उपस्थित होत्या. वृषाली मगदूम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

### प्रवाशाचे विसरलेले सोन्याचे ब्रेसलेट केले परत

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १०, कोपरा येथील स्वप्नील कोळी या रिक्षाचालकाने ६० हजार रुपये किमतीचे जवळपास एक तोळे सोन्याचे ब्रेसलेट संबंधित महिलेला परत करून प्रामाणिकपणा दाखविला.



रिक्षाचालक खारघर सेक्टर १० बँक ऑफ इंडिया परिसरात प्रवासाची वाट पाहत बसला असताना त्याच परिसरातील एक महिला वाशीला जाण्याकरीता रिक्षात बसली. रिक्षाचालकाने या महिलेला अनेक वेळा वाशीला सोडले असल्यामुळे त्यांची ओळख झाली होती. याच ओळखीतून कधीकाळी कुठे जाण्याकरीता रिक्षाची गरज लागेल म्हणून प्रवासी महिलेने रिक्षाचालकाचा मोबाईल नंबर घेऊन ठेवला होता. वाशीला प्रवासी महिलेला सोडल्यानंतर रिक्षाचालक माघारी परतताना प्रवासी महिलेचे ब्रेसलेट हातात नसल्याचे लक्षात आले. या गडबडीत तिने घरी फोन करून ब्रेसलेट हातात नसल्याचे सांगितले.

या दरम्यान रिक्षाचालकालाही फोन करून रिक्षा चालकाला ब्रेसलेट रिक्षामध्ये पडले आहे का? पाहण्यास सांगितले. त्याचवेळी प्रवासी सोडून रिक्षा माघारी नेरूळ येथे पोहचलेले असताना प्रवासी शीटची झडती घेतल्यानंतर त्याला ब्रेसलेट आढळले. महिला प्रवाशाला हे फोन करून कळवले. त्यानंतर रिक्षा चालकाकडून सेक्टर १० बँक ऑफ इंडिया रिक्षा स्टॅन्ड परिसरात बोलवून रिक्षा चालकाने सर्व रिक्षाचालकांच्या समवेत या महिलेला ब्रेसलेट परत करून आपला प्रामाणिकपणा दाखविला.

## बजरंगी मित्र मंडळाकडून गोमातेची विशेष काळजी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विश्व हिंदु परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने साकारलेले रसायनी पाताळगंगा येथील बजरंगी मित्र मंडळाचे गोमाता संरक्षक मलेश गुडसे यांच्या सहकार्यातून बजरंगी बांधव परिसरातील गोमातांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसतात.



परिसरातील गोमांताना कोणतीही इजा झाल्यास हे बजरंगी बांधव एकत्रित येतात आणि पशुवैद्यकिय डॉक्टरांशी संपर्क करून गोमातेचे संरक्षण करताना परिसरात कुठे ना कुठे दिसतातच. रसायनी परिसरातील काही गाईंची नखे व शींगे वाढली आहेत, त्यांना चालताना खुप त्रास होतो अशी माहिती बजरंगी बांधवांजवळ अनेकांनी बोलून दाखविली. त्या गोमातेची पशुधन विकास अधिकारी व बजरंग दल सदस्यांनी शनिवारी दुपारी मोहोपाडा मैदानाजवळ अडवून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत कोकरे, दिनानाथ पाटील, जनार्दन मालुसरे यांच्या सहकार्यांने गोमातांच्या पायाची वाढलेली नखे काढण्यात आली.

या वेळी गोरक्षक प्रमुख मलेश गुडसे, अध्यक्ष जनार्दन मालुसरे, सयोजक, प्रशांत तांबोळी, गोरक्षक प्रमुख राजा जांभुळकर, सहसयोजक दिनेश पडवळ, नामदेव केदारी, संदीप तांबोळी, सुभाष खुडे, सुभोद मिश्रा आदी उपस्थित होते. बजरंग दलाच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# निवडक




## महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**रोहा** : येथील तहसील कार्यालय व पंचायत समिती येथे महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. तहसील कार्यालयात नायब तहसीलदार राजेश थोरे यांच्या हस्ते बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. या वेळी नायब तहसीलदार पुंडलिक मोकल, राकेश सावंत, जंगम समाजाचे नेते विनोदस्वामी जंगम, जाधव, स्वाती चावरेकर आधी उपस्थित होते, तर पंचायत समिती येथील कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, कृषी अधिकारी दांडेकर, नरेश भोईर आदी उपस्थित होते.

## वामन म्हस्के यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव** : तालुक्यातील मुगवली गावचे रहिवासी तथा श्री



गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळ माणगावचे कार्याध्यक्ष कीर्तन व प्रवचनकार वामन नथू म्हस्के यांना आविष्कार फाऊंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. याबाबतचे पत्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार व रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे यांनी दिले आहे. या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि.१२) सकाळी ११ वा. पन्हाळगड, (जि. कोल्हापूर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. पुरस्काराबद्दल म्हस्के यांचे अभिनंदन होत आहे.

## मुरुड आगारात नवीन गाड्यांची प्रतीक्षा

**मुरुड** : येथील आगारात सध्या जुन्या बस असल्याने प्रवासीवर्ग त्रस्त झाला आहे. जुन्या बसेस मुळे प्रवासीवर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. असणाऱ्या गाड्यांमध्ये वृद्धी न झाल्याने नवीन बसेस सुरु करण्यास दिरंगाई झाली आहे. बसेसची संख्या जास्त नसल्यामुळे रातराणी १०.३० वाजता मुंबईवरून सुटणारी गाडी गेले कित्येक वर्ष बंद करण्यात आली आहे. औरंगाबाद गाडी बंद आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यासुद्धा बंद करण्यात आली आहे. मागणी असतानाही गाड्या उपलब्ध नसल्याने व गाड्या सुरु न करता आल्याने प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत. जुन्या गाड्या झालेल्या असताना विभाग नियंत्रक कार्यालयाकडून नवीन गाड्यासुद्धा देण्यात आलेल्या नाहीत. जुन्या गाड्या झाल्याने मध्येच बंद पडत आहेत. याचा प्रवासीवर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मुरुड आगाराला नवीन गाड्या देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# खासदार बारणेंकडून मावळमध्ये विकास

## कर्जत येथील सभेत आमदार महेंद्र थोरवे यांचे प्रतिपादन




**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात रस्ते वाहतुकीचे जाळे विकसित करण्यात शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे खासदार बारणे यांनी दहा वर्षात काय केले हे पाहण्याची नजर असावी लागते. वाघेरे तुम्ही उबाठा शिवसेनेत कधी आलात हो? मुस्लिम समाज हा राज्याच्या राजकारण काहीही झाले तरी कर्जतमध्ये आपल्याच पाठीशी ठामपणे उभा राहिलेला दिसेल. कार्यकर्त्यांनी गाफील राहू नये, अशा सूचना आमदार महेंद्र थोरवे यांनी कार्यकर्त्यांना केल्या.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या आतापर्यंत झालेल्या प्रचाराचा आढावा घेण्यासाठी कर्जतजवळील पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहात प्रमुख कार्यकर्त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी आमदार थोरवे बोलत होते.

या सभेस शिवसेनेचे उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, संपर्कप्रमुख विजय पाटील, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, सल्लागार गजेंद्र वाघेश्वर, माजी नगराध्यक्ष मोहन अवसरमल, जिल्हा सचिव नंदू कोळंबे, मतदारसंघ संपर्कप्रमुख पंकज पाटील, संघटक शिवराम बदे, कर्जत तालुकाप्रमुख संभाजी जगताप, खालापूरचे संदेश पाटील, युवासेना तालुकाप्रमुख अमर मिसाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे पुढे म्हणाले, २०१४ ते २०२४पर्यंत दहा वर्षाच्या काळात देश बदलला आहे हे सर्वांनी पाहिले आहे. त्याआधी देश भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारात अडकला होता आणि त्या वेळी आलेल्या योजना हा कागदावर राहून त्यातून गैरव्यवहार सुरू होता, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या नियोजनबद्ध विकासकामांमुळे आपल्या देशाची प्रतिमा जगाच्या पातळीवर उंचावली आहे. हा आश्वासक बदल देशात तळागाळात नेण्यासाठी आपल्याला तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवायचे आहे आणि त्यासाठी आपला खासदार नवी दिल्लीत पाठवायचा आहे.

विरोधी उमेदवार आपल्या खासदारावर दहा वर्षात काय केले? अशी टीका करतात. अटल सेतू, आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई, पनवेल, उरण, खालापूर या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे याचे मोठे श्रेय खासदार श्रीरंग बारणे यांना आहे. कार्यकर्त्यांनी एकत्रित आणि प्रामाणिकपणे काम करायचे आहे.

शिवसेनेचे उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी मावळची लढत सोपी आहे, पण आपण फाजील आत्मविश्वास ठेवून राहू नये. मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व सहा विधानसभा मतदारसंघातील आमदार महायुतीचे आहेत. त्यामुळे विरोधक मतदारांना फितवून खासदार श्रीरंग बारणे हे मतदारसंघात कुठेही फिरले नाहीत असा प्रचार करीत आहेत. या मतदारसंघात मुस्लिम समाज शिवसेनेसोबत नाही असा खोटा प्रचार केला जात आहे, परंतु आमदार आणि खासदारांनी मुस्लिम मोहल्ल्यातही विकासकामे केली असल्याने मुस्लिम समाज आपल्या पाठीशी राहणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.

शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख विजय पाटील यांनी, आपण महायुतीमधून निवडणूक लढवत असलो तरी या मतदारसंघात धनुष्यबाण या निशाणीवर लढत असल्याने निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान करताना निवडणूक चिन्हाची चिंता आपल्याला नाही. कर्जत-खालापुर मतदारसंघातील विकास हा आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून झाला आहे. त्यामुळे विकासाच्या मुद्द्यावर जास्त मताधिक्य देण्यासाठी सर्वांनी आघाडी घ्यावी, असे आवाहन केले.

सुरुवातीला कर्जत तालुकाप्रमुख संभाजी जगताप यांनी प्रास्ताविकात, आपल्याला मताधिक्य देण्याची तयारी पूर्ण झाली असून कोणत्याही कार्यकर्त्याने चुकीचे काम निवडणूक काळात करू नये, अशी सूचना केली.

आदिवासी सेल कर्जत तालुका अध्यक्ष गणेश केवारी, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष मोहन अवसरमल, खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, युवासेना तालुकाप्रमुख अमर मिसाळ, माजी सभापती निवृत्ती पिंगळे यांनीही मनोगते व्यक्त केली.

# रोहा बाजारपेठेत वाहतूक कोंडी

**रोहा : प्रतिनिधी**

तालुक्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या रोहा शहरातील बाजारपेठेत सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास वाहनधारकांना व नागरिकांना होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील तीन बत्ती नाका ते राम मारुती चौकदरम्यान सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येते.

रोह्यातील वाहतूक कोंडीचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुरुडकडे जाणारे सर्व पर्यटक याच मार्गावरून जात असल्याने रोहा बाजारपेठेत दोन गाड्या एकत्रित आल्यावर अरूंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी होते. दुसरीकडे बाजारपेठेतील दुकानात येत असलेला ट्रान्सपोर्टचा माल उतरवण्यासाठी बाजारपेठेत ट्रान्सपोर्टच्या गाड्या उभ्या राहत आहेत. या गाड्यांमुळे येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्यांना अडथळा निर्माण होऊन बाजारपेठेत वाहतूक कोंडी होते.

रोहा नगर परिषद ते राम मारुती चौक, वीर सावरकर रोडवर वाहतूक कोंडी होते. दोन मोठी वाहने विशेषतः कंपनीच्या बसेस आल्यानंतर ही वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येते. बाजारात खरेदीसाठी आलेले नागरिकही आपली चारचाकी वाहने बिनधास्तपणे बाजारपेठेत उभी करत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

वाहतूक कोंडी रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मुरूडसाठी जाणाऱ्या पर्यटकांना खारीमार्गे जाण्यासाठी दिशा फलक लावल्यास त्याचा फायदा वाहतूक कोंडी रोखण्यासाठी होईल.

रोहा शहरातील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी संबंधित विभागाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.



# मुरूडमध्ये मत्स्यदुष्काळ; अर्ध्याहून अधिक मच्छीमार नौका किनाऱ्यावर

**मुरूड : प्रतिनिधी**



मार्चपासून अपेक्षित मासळी मिळत नसल्याने खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. होडीसाठीचे डिझेल, खाना खर्च, बर्फ, खलाशांची मजुरीही न सुटल्याने मुरुड तालुक्यात ५५ ते ६० टक्के होड्या समुद्र किनारी विसावल्याचे चित्र मुरूडसह, एकदरा, राजपुरी, आगरदांडा, कोर्लई, बोर्ली आदी बंदर किनारी दिसत आहे.

वास्तविक या मोसमात जवळा, पॉपलेट व कोळंबी ही मासळी विपूल प्रमाणात मिळत असते, मात्र समुद्रात होणाऱ्या बदलांमुळे खोल समुद्रात जाऊनदेखील मासळी मिळत नसल्याने मच्छीमार समाजाची चिंता वाढू लागली आहे. बहुतांशी होड्या समुद्रात न गेल्याने ताजी मासळी बाजारातून गायब झाली आहे. त्यामुळे लोकांना चढ्या भावाने मासळी खरेदी करणे खिशाला परवडनासे झाले आहे.

पारंपरिक मच्छीमारांना मासळी न मिळण्याचे प्रमुख कारण हे एलईडी पद्धतीने होणारी मासेमारी. शक्तीमान दिव्यांच्या प्रकाशझोतात सर्व मासळी आर्कषित होत असल्याने एलईडी पद्धतीने मासेमारी करणारे तेजीत असल्याची चर्चा आहे. तथापि, एलईडी मासेमारीला मत्स्य विभागाकडून परवानगी नाही आणि अशा पद्धतीची बोट ५० ते ६० लाखांच्या घरात जाते.

मुरूड तालुक्यातील मच्छीमार दादली पद्धतीनेच मासेमारी करतात. अनुक्रमे दोन, चार वा सहा सिलिंडरच्या होड्या दादली पद्धतीने मासेमारीसाठी वापरल्या जातात, पण मिळणारी मासळी आणि त्यावर होणारा खर्च याचा ताळमेळ बसत नसल्याने होड्या किनाऱ्यावरच सुरक्षित ठेवणे बरे अशा भूमिकेत कोळी समाज दिसून येत आहे.

सद्यस्थितीत मुरुड बाजारात मासळीची आवक प्रचंड घटली असून बाहेरून आणली जाणारी मासळी ज्याला स्थानिक महिला विक्रेत्या पार्सलची मच्छी या नावाने संबोधत असतात त्यावर मासळी बाजारात पर्यटकांच्या उड्या पडतात. त्यामुळे स्थानिकांना बऱ्याचदा चढ्या भावात मासळी खरेदी लागते. खोल समुद्रात मासेमारी करूनसुद्धा समाधानकारक मासळी मिळत नसल्याने होणारा तोटा वाढू नये यासाठी असंख्य मच्छिमारांनी होड्या किनाऱ्याला शाकारल्या आहेत. कर्ज वाढण्यापेक्षा मासेमारी न केलेली बरी असे समजून होड्या किनारी शाकारलेल्या दिसतात.

**हवामान बदलामुळे समुद्रातील मासळी खूप दूरवर निघून गेली आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांना मासळी मिळत नाही. तरीही काही मच्छीमार दूरवर जाऊन मासेमारी करीत आहेत, परंतु यामध्ये काहींना यश मिळते, तर काहींना अपयश येत आहे. त्यामुळे मासेमारीचे संकट उभे ठाकले आहे. यामुळेच बहुतांशी होड्या किनाऱ्याला लागलेल्या दिसत आहेत.**

**-मनोहर बैले, उपाध्यक्ष, रायगड जिल्हा मच्छीमार संघ**

# खोरा बंदरातील जेट्टी पूर्णत्वाच्या मार्गावर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील खोरा बंदरातील जेट्टीचे काम प्रगतिपथावर असून ऑक्टोबरपर्यंत हे काम पूर्ण होऊन पर्यटकांच्या सुविधेसाठी ही जेट्टी वापरात येईल, असा विश्वास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून व्यक्त करण्यात येत आहे. सध्या या जेट्टीचे काम जोरदार सुरू आहे.

गृह व बंदर विभागाकडून ६ एप्रिल २०२२ रोजी खोरा बंदर येथे असणाऱ्या प्रवासी जेट्टीची उंची व लांबी वाढवण्यासाठी १११ कोटी २६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता तसेच जेट्टीला आवश्यक असणाऱ्या सुविधा पुरविण्यासाठीसुद्धा अतिरिक्त निधी देण्यात आला होता. या जेट्टीचे काम ऑक्टोबर २०२३मध्ये सुरू करण्यात आले. सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या जेट्टीवर ही ओहटीच्या वेळी प्रवासी वाहतूक करणे अडचणीचे होत असल्याने या कामास तातडीने निधी मंजूर करण्यात आला. सध्या बांधण्यात येणारी जेट्टी ही नव्या स्वरूपात बांधण्यात येत असून सुमारे १५० मीटर पाण्याच्या आत काम केले जाणार असल्याने ओहटीच्या वेळी प्रवास करताना कोणताही त्रास प्रवासीवर्गाला होणार नाही. जुनी जेट्टीची लांबी कमी असल्याने ओहटीच्या वेळी प्रवासी होड्या अडकून पडत असत. ही अडचण लक्षात घेऊन नवीन जेट्टी बांधण्यासाठी तिची लांबी वाढवण्यात आली आहे. खोरा बंदरातून सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सहज जाता येता यावे यासाठी ही जेट्टी उपयुक्त ठरणार आहे.

दरवर्षी राजपुरी व खोरा बंदरातील जेट्टीवरून सात लाखांपेक्षा जास्त पर्यटक जंजिरा किल्ल्यास भेट देत असतात. पर्यटकांच्या माध्यमातून प्रत्येक प्रवासीवर्गाच्या मागे ठराविक लेवी कर आकारला जाऊन त्याचे उत्पन्न महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास मिळत असते. या दोन्ही बंदरात तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी ही वरदायी ठरणार आहे. लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवर शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत.





**श्रीवर्धन : मावळतीचा क्षण आणि समुद्र किनाऱ्यावरील वाऱ्याची मंद झुळूक अशा आल्हाददायक वातावरणात व्यायाम करताना पर्यटक दिसत आहेत.** (छाया : अमेय नाझरे)

# गुजरातची चेन्नईवर मात; गिल, सुदर्शनची शतकी खेळी

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्जचा ३५ धावांनी पराभव केला. या विजयासह गुजरातने प्ले ऑफच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत तीन बाद २३१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात चेन्नईचा संघ आठ बाद १९६ धावा करू शकला. गुजरातकडून शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी शतके झळकावली आणि त्यानंतर मोहित शर्मा आणि राशिद खान यांनी गोलंदाजीत कमाल करीत अनुक्रमे तीन आणि दोन विकेट्स घेतल्या.



लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात खूपच खराब झाली. चेन्नईने पॉवरप्लेच्या षटकात तीन गडी गमावून ४३ धावा केल्या होत्या. येथून डॅरिल मिशेल आणि मोईन अली यांच्यात १०९ धावांची उत्कृष्ट भागीदारी झाली. पुढच्या सहा षटकांत दोघांनी ७६ धावा जोडल्या. त्यामुळे १२ षटकांनंतर संघाची धावसंख्या तीन गड्यांच्या मोबदल्यात ११९ धावा झाली. दरम्यान, १३व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मिशेल मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात ६३ धावा करून बाद झाला. त्याने ३४ चेंडूंत सामना करताना सात चौकार आणि तीन षटकार मारले. यानंतर १५व्या षटकात मोईन अलीही ५६ धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने ३६ चेंडूंत चार चौकार आणि चार षटकार मारले.

चेन्नईला विजयासाठी शेवटच्या पाच षटकांत ८९ धावांची गरज होती. १७व्या षटकात २१ धावा काढून शिवम दुबेही बाद झाला, पण रवींद्र जडेजा गोलंदाजांना चितपट करण्याच्या मूडमध्ये होता. दरम्यान, राशिद खानने १८व्या षटकात दोन बळी घेत गुजरातचा विजय जवळपास निश्चित केला होता. धोनीने ११ चेंडूंत २६ धावांची शानदार खेळी खेळली, तर जडेजाने १० चेंडूंत १८ धावा केल्या, परंतु बरेच प्रयत्न करूनही चेन्नईला आठ विकेट गमावून १९६ धावाच करता आल्या आणि सामन्यात ३५ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

तत्पूर्वी गुजरात टायटन्ससाठी शुबमन गिल आणि साई सुदर्शन या दोन्ही सलामीवीरांनी शतकी खेळी खेळली. गिलने ५५ चेंडूंत १०४ धावा चोपल्या, ज्यात त्याने नऊ चौकार आणि सहा षटकार मारले. दुसरीकडे सुदर्शनने ५१ चेंडूंत १०३ धावांची खेळी केली. यामध्ये त्याच्या बॅटमधून पाच चौकार आणि सात षटकार आले. गिल-सुदर्शन ही आयपीएलच्या इतिहासात सामन्याच्या एका डावात शतके झळकावणारी तिसरी जोडी ठरली आहे. याशिवाय गिल आणि सुदर्शन यांनी आयपीएलच्या इतिहासात पहिल्या विकेटसाठी सर्वांत मोठी भागीदारी करण्याचा विक्रम केला. गिल आणि सुदर्शन यांनी पहिल्या विकेटसाठी २१० धावांची भागीदारी केली. त्याच्या आधी २०२२मध्ये क्विंटन डी कॉक आणि केएल राहुल यांनी पहिल्या विकेटसाठी २१० धावांची भागीदारी केली होती.

## खोपोलीची कुस्तीपटू क्षितिजा मरागजेची रोमानियातील विशेष प्रशिक्षणासाठी निवड

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय खेल प्राधिकरणच्या वतीने फॉरेन एक्सपोजर निवड चाचणी उत्तर प्रदेशमधील लखनऊ येथे नुकतीच झाली. या निवड चाचणीत देशभरातून भारतीय खेल प्राधिकरण सराव केंद्रात सराव करणाऱ्या राज्य व राष्ट्रीय पदक विजेत्या महिला कुस्तीपटूंनी विविध वजन गटात सहभाग नोंदवला होता. या आयोजनातून अंतिमतः १२ महिला कुस्तीपटू निवडण्यात आले असून त्याना पुढील ॲडव्हान्स ट्रेनिंगसाठी युरोपमधील रोमानिया देशात पाठविण्यात येणार आहे. यात खोपोलीची राष्ट्रीय पदक विजेती खेळाडू क्षितिजा जगदीश मरागजे हिने ५० ते ५४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तीदेखील रोमानियात विशेष प्रशिक्षणासाठी जाणार आहे.



क्षितिजा ही खोपोलीतील कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलात सराव करीत असताना खेल प्राधिकरणाच्या कांदिवली (मुंबई) येथील सराव केंद्रात तिची निवड झाली होती. तेथूनच आता तिची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षणासाठी निवड झाल्याने तिला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक राजाराम कुंभार, उद्योजक यशवंत साबळे, राज्य कुस्ती मार्गदर्शक संदीप वांजळे, विजय चव्हाण, दिवेश पालांडे, ओमकार निंबळे, रोशनी परदेशी, कार्मेल कॉन्व्हेंट खोपोलीच्या प्राचार्य लीली पॉल, खालापूर तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते पैलवान मारूती आडकर, खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत, खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र आतनूर यांनीही क्षितिजाचे विशेष कौतुक केले आहे.

# धोनीने केली डिव्हिलियर्सशी बरोबरी

## षटकार मारण्यात विराट-रोहितच्या क्लबमध्ये दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून चेन्नई सुपर किंग्ज संघाला पराभव पत्करावा लागला. चेन्नई संघ सामना हरला असला तरी महेंद्रसिंह धोनीने एक खास पराक्रम केला आहे. षटकार मारण्यामध्ये त्याने दक्षिण आफ्रिकेचा महान फलंदाज एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे.

चेन्नईचा माजी कर्णधार एमएस धोनीने गुजरातविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात ११ चेंडूंत २६ धावांची नाबाद खेळी केली. या सामन्यात त्याने एक चौकार आणि तीन षटकार ठोकले. या सामन्यात धोनीने तिसरा षटकार ठोकताच एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी



बरोबरी साधली. धोनीच्या नावावर आता आयपीएलमध्ये २५१ षटकार आहेत. एबी डिव्हिलियर्सनेही आयपीएलमध्ये इतकेच षटकार ठोकले आहेत. डिव्हिलियर्सने १७० डावांत २५१ षटकार मारले, तर धोनीने २२८ डाव घेतले. आता हे दोन्ही फलंदाज आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानावर आहेत.

याआधी रोहित शर्माच्या नावावर २५० डावांमध्ये २७६ षटकार आहेत, तर विराट कोहलीने आतापर्यंत २४१ डावांमध्ये २६४ षटकार मारले आहेत. आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर आहे. गेलने तब्बल ३५७ षटकार मारले आहेत.

# 'इशान-श्रेयसला करारातून वगळण्याचा निर्णय आगरकरांचा'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी एक मोठा खुलासा केला आहे. इशान किशन आणि श्रेयस अय्यर यांना बीसीसीआयच्या वार्षिक करारातून वगळण्याचा निर्णय पूर्णपणे मुख्य निवडकर्ता प्रमुख अजित आगरकर यांचा होता, असे शाह यांचे म्हणणे आहे.



इशान किशन आणि श्रेयस अय्यर यांना बीसीसीआयने या वर्षी जारी केलेल्या वार्षिक करारात स्थान मिळाले नाही. त्यानंतर अनेक दिग्गजांनीही बोर्डाच्या या निर्णयावर आपले मत व्यक्त केले होते. यावर जय शाह म्हणाले की, खरंतर बीसीसीआयच्या निर्देशानंतरही इशान आणि अय्यरला देशांतर्गत स्पर्धा न खेळल्याबद्दल करारातून बाहेर ठेवण्यात आले होते. गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषकानंतर इशानने दीर्घ विश्रांती घेतली आणि थेट चालू आयपीएलमध्ये परतला. त्याचवेळी अय्यरने मुंबईसाठी रणजी ट्रॉफीमधील उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसह काही सामने खेळले. मुंबईचा संघ रणजी खेळत असताना अय्यर कोलकाता नाईट रायडर्सच्या मुंबई कॅम्पमध्ये सहभागी होत होता.

बीसीसीआय कार्यालयात माध्यमांशी संवाद साधताना जय शाह म्हणाले, तुम्ही संविधान पाहू शकता. मी फक्त निवड समितीचा निमंत्रक आहे. याबाबत जो काही निर्णय घेतला गेला तो मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी घेतला आहे. माझी भूमिका फक्त निवड समितीची मते स्वीकारून त्यांची अंमलबजावणी करण्याची आहे. टीम इंडियासाठी कोणताही खेळाडू फार महत्त्वाचा नाही. जेव्हा इशान आणि अय्यर कॉन्ट्रॅक्ट लिस्टमधून बाहेर झाले, तेव्हा आम्हाला संजू सॅमसनसारखा चांगला खेळाडू मिळाला. त्यामुळे भारतीय खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटला प्राधान्य द्यावे लागेल.

# लेव्हरकूसेन संघाने बेन्फिकाचा विक्रम मोडला

## सलग ४९ सामने अपराजित

**लेव्हरकूसेन : वृत्तसंस्थअ**

जोसिप स्टॅनिसिचने ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत केलेल्या गोलच्या जोरावर जर्मन संघ बायर लेव्हरकूसेनने युरोपा लीग फुटबॉलमधील उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात इटालियन संघ एएस रोमाला २-२ असे बरोबरीत रोखले. यासह लेव्हरकूसेनने सर्व स्पर्धातील आपले अपराजित्वही कायम राखताना युरोपीय क्लबसाठी नवा विक्रमही रचला.

स्पेनचा माजी मध्यरक्षक झाबी अलोन्सोच्या मार्गदर्शनाखाली खेळणारा लेव्हरकूसेनचा संघ सर्व स्पर्धांमध्ये मिळून सलग ४९ सामने अपराजित असून त्यांनी



बेन्फिकाचा विक्रम मोडीत काढला. बेन्फिकाचा संघ डिसेंबर १९६३ ते फेब्रुवारी १९६५ या कालावधीत सलग ४८ सामने अपराजित राहिला होता.

लेव्हरकूसेनचा संघ रोमाविरुद्धच्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात पराभवाच्या छायेत होता. लिआंड्रो पेरेडेसच्या दोन गोलच्या जोरावर रोमाने ६६व्या मिनिटाला २-० अशी आघाडी मिळवली होती, मात्र त्यानंतर ८२व्या मिनिटाला जिआनलुका मॅन्चिनीकडून झालेल्या स्वयंगोलमुळे लेव्हरकूसेनच्या आशा पल्लवित झाल्या. मग ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेतील सातव्या मिनिटाला स्टॅनिसिचने गोल करीत लेव्हरकूसेनला बरोबरी करून दिली. लेव्हरकूसेनने पहिल्या टप्प्यातील सामना २-० असा जिंकला होता. त्यामुळे त्यांनी रोमाचा एकूण ४-२ असा पराभव करीत युरोपा लीगच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम फेरीत लेव्हरकूसेनसमोर अटलांटाचे आव्हान असेल. अटलांटाने मार्सेवर दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात ३-० असा विजय मिळवला. त्यापूर्वी पहिल्या टप्प्यातील सामना १-१ असा बरोबरीत संपला होता.

## कर्णधार शुबमन गिलसह संपूर्ण गुजरात संघाला दंड

### स्लो ओव्हर रेटमुळे कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिल आणि साई सुदर्शनच्या शतकी तडाख्याच्या जोरावर गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्ज संघावर शुक्रवारी विजय मिळवला, मात्र या विजयानंतर बीसीसीआयने कारवाई करत गिलसह संघाला दंड ठोठावला आहे.

गुजरातचा कर्णधार शुभमन गिलला चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या आयपीएल सामन्यादरम्यान स्लो ओव्हर रेटसाठी २४ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा गुजरात संघाचा सीझनमधील दुसरा स्लो ओव्हर रेटचा गुन्हा होता आणि यानंतर इम्पॅक्ट खेळाडूसह उर्वरित ११ खेळाडूंना वैयक्तिकरित्या सहा लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला.

## साई सुदर्शनने टाकले सचिन, ऋतुराजला मागे

### आयपीएलमध्ये जलद हजार धावा पूर्ण करणारा भारतीय खेळाडू

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये शुक्रवारी चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध साकारलेल्या विजयात गुजरात टायटन्स संघाचा सलामीवीर साई सुदर्शन चमकला. त्याने व कर्णधार शुबमन गिल यांनी शतके झळकावत चेन्नईच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. यासह साई हा आयपीएलच्या इतिहासात सर्वांत जलद एक हजार धावा पूर्ण करणारा भारतीय खेळाडू ठरला. या बाबतीत त्याने ऋतुराज गायकवाडसह मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरलाही मागे टाकले आहे.

साई सुदर्शनची आयपीएलमधील ही २५वी इनिंग होती. या इनिंगमध्ये त्याने आयपीएलमधील एक हजार धावा पूर्ण केल्या. त्याच्या आधी हा विक्रम सचिन तेंडुलकर आणि ऋतुराज गायकवाड यांच्या नावावर होता, ज्यांनी ३१व्या डावात ही



कामगिरी केली होती. एकूण विक्रमाबद्दल बोलायचे, तर तो शॉन मार्शच्या नावावर आहे. ऑस्ट्रेलियाच्या शॉन मार्शने २१व्या डावात एक हजार धावा पूर्ण केल्या होत्या. लेंडल सिमन्सने २३ आणि मॅथ्यू हेडनने २५व्या डावात एक हजार धावांचा आकडा गाठला आहे.

# ठाण्यात रन फॉर वोट मिनी मॅरेथॉनद्वारे मतदान जनजागृती

**ठाणे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे यासाठी ठाणे शहरात आयोजित केलेल्या रन फॉर व्होट या मिनी मॅरेथॉनला ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवकांनी मोठ्या संख्येने निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी मतदान करावे, असा संदेश ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या तरुणांना दिला.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे महापालिका, ठाणे जिल्हा ॲथलेटिक असोसिएशन आणि ठाणे सिटीझन्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रन फॉर व्होट या मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथील मुख्य रस्त्यावर ही मॅरेथॉन स्पर्धा झाली.



स्पर्धेस ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या झेंडा दाखवून सुरुवात केली.

प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे. प्रत्येकाने येत्या २० मे रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करावे, असे आवाहन ठामपा सौरव राव यांनी उपस्थित मतदारांना केले.

रन फॉर वोट या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत ठाणे लोकसभा मतदारसंघ अंतर्गत ठाणे विधानसभा मतदारसंघ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथक कर्मचाऱ्यांनी धावपटू मतदारांसोबत सहभागी होऊन मतदानाबाबत जनजागृती केली तसेच स्वीपच्या पथकाने धावपटूंना मतदानाची शपथ दिली. मी मतदान करणारंच... आपणही मतदानासाठी सज्ज रहा या आशयाचा मजकूर असलेले व त्यावर मतदान २० मे २०२४ असलेले माहितीपत्रकाचे वाटपही उपस्थित धावपटू मतदार व नागरिकांना करण्यात आले.

या मिनी मॅरेथॉन स्पर्धेस धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर तरुणांनी सेल्फी काढून मतदार जनजागृतीच्या घोषणा दिल्या.

लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी देशाच्या भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता २० मे रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन रन फॉर वोट मिनी मॅरेथॉनमध्ये सहभागी असलेल्या सर्व नागरिकांना स्वीप पथकामार्फत करण्यात आले.

## ...तर द्रविडला नव्याने अर्ज करावा लागेल

**मुंबई** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) पुरुष संघासाठी नव्या मुख्य प्रशिक्षकाचा शोध लवकरच सुरू करणार असून यासाठी आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषकापूर्वी अर्ज मागवले जाणार असल्याचे बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी शुक्रवारी सांगितले आहे, परंतु सध्याचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडला या पदावर कायम राहायचे असल्यास त्याला नव्याने अर्ज करावा लागेल.

द्रविडसोबत बीसीसीआयने प्रथम दोन वर्षांचा करार केला होता. त्याचा हा करार गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषकानंतर संपुष्टात आला, मात्र द्रविडसह सर्व साहाय्यक प्रशिक्षकांचा करार पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकापर्यंत वाढविण्यात आला होता. आता बीसीसीआयकडून नव्या प्रशिक्षकाचा शोध घेतला जाणार असून ही नियुक्ती तीन वर्षांसाठी असेल.

'आम्ही भारतीय पुरुष संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी येत्या काही दिवसांत नव्याने अर्ज मागवणार आहोत. राहुल द्रविड यांचा कार्यकाळ आता संपुष्टात येणार आहे. त्यांना प्रशिक्षकपदी कायम राहायचे असल्याने पुन्हा अर्ज करावा लागणार आहे. नव्या प्रशिक्षकांची निवड ही तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल,' असे शाह यांनी स्पष्ट केले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com